# कामगार आयुक्त, यांचे कार्यालय, मुंबई
# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.

## ५१ व्या बैठकीचे इतिवृत्त

*******

स्थळ :- सहयाद्री अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई

वेळ :- सकाळी ११.३० वा.

दिनांक. :- ०३.०६.२०१९

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | मागील बैठकीचे इतिवृत्त कायम करणे. | ०४ |
| २. | सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील बांधकाम कामगारांची नोंदणी, लाभ वाटप व खर्चाचा तपशील सादर करणेबाबत. | ०५-१० |
| ३. | बांधकाम कामगारांच्या व्याख्येत अंतर्भूत २१ कामांवरील बांधकाम कामगारांची नोंदणीकरीता अभियान राबविणे व विविध कल्याणकारी योजनेंतर्गत लाभ वाटप कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करणे. | ११-१६ |
| ४. | मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना पुढे चालू ठेवण्याबाबत विचार विनिमय करणे. | १७-३४ |
| ५. | नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तूंच्या संचाचे वितरण करणे. | ३५-३८ |
| ६. | मंडळाकडील नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी प्रसार प्रसिधदीच्या वार्षिक आराख्याडयास मान्यता देणे | ३९-४२ |
| ७. | मंडळाच्या मुख्यालयाकरिता एमएमटीसी लि, भारत सरकारचा उपक्रम, बीकेसी बान्द्रा (पूर्व) येथील जागा भाडेतत्वावर घेण्याबाबत. | ४३-४६ |
| ८. | मुख्यालय, विभागीय कार्यालय व जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरिता संस्था निश्चितीस व दरस्वीकृतीस तसेच, फर्निचर पुरवठा व इस्टॉलेशनच्या तपासणीकरीता वास्तूविशारदाच्या नेमणुकीस मान्यता देण्याबाबत. | ४७-५१ |
| ९. | अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) व अटल आहार योजनांच्या लाभ वाटपाच्या कार्यक्रमावरील खर्चास मान्यता देणेबाबत. | ५२-५४ |
| १०. | मंडळाकडील अतिरिक्त निधीची गुंतवणुक करतांना अनुसरावयाच्या सुधारित कार्यपध्दतीबाबत निर्णय घेणे. | ५५-६० |
| ११. | नोंदित बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीच्या अनुषंगाने आरोग्य कक्षाची स्थापना करण्यास मंजुरी देण्याबाबत. | ६१-६३ |
| १२. | मंडळाच्या मंजूर आकृतीबंधानुसार उपलब्ध असलेली लेखापाल संवर्गातील दोन पदे प्रशासकीय कारणास्तव सहाय्यक लेखाअधिकारी या संवर्गामध्ये श्रेणीवाढ करून रूपांतरित करण्याबाबत. | ६४-६५ |
| १३. | उपकर परतावा बाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्येतेस सादर. | ६६-६९ |
| १४. | उस्मानाबाद जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या नोंदणी व लाभ वाटपामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत सविस्तर चौकशी करण्यास परवानगी देण्याबाबत. | ७०-७७ |

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक ०३.०६.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ५१ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर, मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५१ वी बैठक शुक्रवारी दिनांक ०३.०६.२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. सहयाद्री अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण |
| २. | मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ३. | मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. आर. आर. जाधव, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. शशांक साठे, उप सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ७. | मा. श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ८. | मा. श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ९. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| १०. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ११. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक ०१.०३.२०१९ रोजीच्या मंडळाच्या ५० व्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र. १: मागील बैठकीचे इतिवृत्त कायम करणे.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक ०१.०३.२०१९ रोजीच्या ५० व्या बैठकीचे इतिवृत्ताची प्रत मंडळाच्या सर्व सन्मानीय सदस्यांना दि.२२.०५.२०१९ रोजी ई-मेलद्वारे पाठवून बदल असल्यास सूचविणेबाबत कळविण्यात आले होते. सदर इतिवृत्त मंडळ सचिव यांनी बैठकीत वाचून दाखविले व काही बदल असल्यास तसे सूचविण्यास विनंती केली. मंडळाच्या दिनांक ०१.०३.२०१९ रोजीच्या ५० व्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत सविस्तर चर्चेअंती मान्यता प्रदान करण्यात आली व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५१(१)/२०१९ :- मंडळाच्या दिनांक ०१.०३.२०१९ रोजीच्या ५० व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. २:- सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील बांधकाम कामगारांची नोंदणी, लाभ वाटप व खर्चाचा तपशील सादर करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३(१) नूसार केंद्र शासन अधिसूचना क्र. एसओ २८९९, दि. २६.०९.१९९६ अन्वये बांधकामाच्या एकुण मुल्याच्या (जमिनीचे मुल्य वगळून) १% दराने उपकर जमा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. केंद्र शासनाच्या सदर अधिसुचनेस अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे परिपत्रक क्र.बी.सीए/ १२००७/प्र.क्र. ७८८/ कार्यासन ७ दि. २१.०४.२००८ अन्वये निर्गमित सुचनेनूसार दि. ०१.०१.२००८ पासून राज्यातील इमारत व इतर बांधकाम नियोक्त्याकडून उपकर वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. सन २०१८-१९ मध्ये मंडळाकडे रु. १२१०.९२ कोटी एवढा उपकर जमा झालेला आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होणारा निधी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम २४ नूसार मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवर खर्च करण्यात येतो.

मंडळामार्फत सद्य:स्थितीत ३२ कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहे. याशिवाय ०३ नवीन योजना आगामी आर्थिक वर्षात राबविणे प्रस्तावित आहे.

मंडळामार्फत करण्यात येत असलेल्या प्रशासकीय खर्चामध्ये प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे वेतन भत्ते, बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते, प्रवास खर्च, मंडळाच्या बैठकांचा खर्च, सनदी लेखापालांची फी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांचे लेखापरीक्षण फी, कार्यालयीन भाडे, मंडळावर नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्थांचे सल्लागार शुल्क, दुरध्वनी खर्च, वाहन खर्च व अन्य कार्यालयीन खर्चाचा समावेश आहे. याशिवाय, उपकर जमा करणाऱ्या प्राधिकरणांना उपकर जमा करण्यासाठी येणारा खर्च (जास्तीत जास्त् जमा उपकराच्या १% ) व उपकर प्रकरणाच्या परताव्यावरील खर्च करण्यात येतो.

मंडळाकडील सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील नोंदित बांधकाम कामगारांची संख्या, लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या, लाभ वाटपावरील खर्च व प्रशासकीय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

# अ. सन २०१८-१९ या वर्षातील बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा तपशील

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | ३१ मार्च २०१८ पर्यंत झालेली नोंदणी | दि.०१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंत झालेली नोंदणी | ३१.०३.२०१९ अखेर एकुण नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या | ३१ मार्च २०१९ अखेर सक्रिय (जिवीत) नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | **कोकण विभाग** | | | | |
| 1 | मुंबई शहर | १८२९५ | १६६६ | १९९६१ | १६९९७ |
| 2 | मुंबई उपनगर पूर्व | १४०४३ | ३७७० | १७८१३ | ४१९८ |
| 3 | मुंबई उपनगर पश्चिम | १७००० | १९८९९ | ३६८९९ | २९८८ |
| 4 | ठाणे | ३११३५ | २९६० | ३४०९५ | १४००२ |
| 5 | पालघर | ७०५९ | ८०६ | ७८६५ | ३६१३ |
| 6 | रायगड | १९७२९ | २३०२ | २२०३१ | ९७९२ |
| 7 | कल्याण | ११९०९ | १५८२ | १३४९१ | ८१६० |
| 8 | भिवंडी | ५८६३ | ७७७ | ६६४० | २७५७ |
| 9 | सिधुदूर्ग | १९४५९ | ६२३० | २५६८९ | १८११६ |
| 10 | रत्नागिरी | ११४८७ | १२५१२ | २३९९९ | १३७७९ |
| | Sub Total | **१५५९७९** | **५२५०४** | **२०८४८३** | **९४४०२** |
| | **पुणे विभाग** | | | | |
| 11 | पुणे | ११२५३१ | ३५८४१ | १४८३७२ | ३६३८३ |
| 12 | सांगली | ३८३७७ | १०७६८ | ४९१४५ | १३२५७ |
| 13 | इचलकरंजी | १४८३१ | १०३२५ | २५१५६ | १४६७८ |
| 14 | सातारा | ३८५७ | ८६२७ | १२४८४ | १००४० |
| 15 | सोलापूर | ६७९६६ | २१५१७ | ८९४८३ | ३५५९९ |
| 16 | कोल्हापूर | ५८८२८ | ११३३७ | ७०१६५ | १४८२७ |
| 17 | बार्शी | १७५७ | ३८७९ | ५६३६ | ४३२४ |
| | Sub Total | **२९८१४७** | **१०२२९४** | **४००४४१** | **१२९१०८** |
| | **नाशिक विभाग** | | | | |
| 18 | नाशिक | २१९१९ | ५९०९ | २७८२८ | १८७५६ |
| 19 | जळगांव | ९१०५ | ११५८८ | २०६९३ | १२३११ |
| 20 | अहमदनगर | ३८३७७ | १३०७० | ५१४४७ | १८१४० |
| 21 | धुळे-नंदूरबार | १०७४३ | १०७५५ | २१४९८ | १२०४९ |
| 22 | मालेगाव | ७४४२ | १७३१ | ९१७३ | ४७७० |
| | Sub total | **८७५८६** | **४३०५३** | **१३०६३९** | **६६०२६** |
| | **औरंगाबाद विभाग** | | | | |
| 23 | औरंगाबाद | ६५०२२ | ७३२२ | ७२३४४ | २०१२१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 24 | नांदेड | १२००१ | १२५६४ | २४५६५ | १४७६१ |
| 25 | लातूर | ४८३०८ | ५१२७३ | ९९५८१ | ५५६९६ |
| 26 | जालना | २६०२६ | २४६३२ | ५०६५८ | ३१२४३ |
| 27 | परभणी | ३०१०८ | १२४५९ | ४२५६७ | १९८४० |
| 28 | हिंगोली | ४०५१ | १८९९५ | २३०४६ | २०८०१ |
| 29 | बीड | १६४०६ | १२७९८ | २९२०४ | ११८०४ |
| 30 | उस्मानाबाद | २५४०१ | १६९९८ | ४२३९९ | ४२३९९ |
| Sub Total | | **२२७३२३** | **१५७०४१** | **३८४३६४** | **२१६६६५** |
| **नागपूर विभाग** | | | | | |
| 31 | नागपूर | ४३६६३ | ४५०२३ | ८८६८६ | ७४७१२ |
| 32 | अमरावती | ४५६०८ | २०८३७ | ६६४४५ | ६०३३६ |
| 33 | भंडारा | ११९८४ | २३७४८ | ३५७३२ | ३३९११ |
| 34 | गोंदीया | १२२९३ | ४३१६४ | ५५४५७ | ४३२६२ |
| 35 | चंद्रपूर | ६१९० | २८२६७ | ३४४५७ | २९६४५ |
| 36 | अकोला | १०६२८ | ९०९१ | १९७१९ | १३३३७ |
| 37 | वाशिम | ३५७२ | ११६५६ | १५२२८ | १२१८९ |
| 38 | वर्धा | २४८७७ | ३७२०४ | ६२०८१ | ४९०७५ |
| 39 | गडचिरोली | ३४०२ | १४६६६ | १८०६८ | १६६२० |
| 40 | बुलडाणा | ७९१७ | ९०३३ | १६९५० | १७३३२ |
| 41 | यवतमाळ | १३६२४ | ६०२४५ | ७३८६९ | ७०९५५ |
| Sub Total | | १८३७५८ | ३०२९३४ | ४८६६९२ | ४२१३८२ |
| **राज्यातील एकूण नोंदणी** | | **९५२७९३** | **६५७८२६** | **१६१०६१९** | **९२७५८३** |

## ब. सन २०१८-१९ या वर्षातील नोंदीत बांधकाम कामगारांना लाभ वाटप/लाभ वाटपावरील खर्च व प्रशासकीय खर्चाचा तपशील

(रु. लाखात)

| .क्र. | जिल्हयाचे नाव | ३१ मार्च २०१८ पर्यंत झालेले लाभ वाटप | | दि.०१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंत झालेले लाभ वाटप | | ३१.०३.२०१९ पर्यतचे लाभ वाटप | | प्रशासकीय खर्च | उपकराच्या रक्कमेतून ३१ मार्च २०१९ पर्यंतचा झालेल्या एकुण खर्च तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | ०१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यतचा प्रशासकीय खर्च | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | मुख्यालय | - | - | - | ३१४२५.१५ | - | ३१४२५.१५ | १३५९.९६ | ३२७८५.११ |

| क्र. | जिल्ह्याचे नाव | ३१ मार्च २०१८ पर्यंत झालेले लाभ वाटप | | दि.०१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंत झालेले लाभ वाटप | | ३१.०३.२०१९ पर्यतचे लाभ वाटप | | प्रशासकीय खर्च | उपकराच्या रक्कमेतून ३१ मार्च २०१९ पर्यंतचा झालेल्या एकुण खर्च तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | ०१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतचा प्रशासकीय खर्च | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| २ | मुंबई शहर | ८१७ | ५१.८७ | १५५४३ | ७५६.८५ | १६३६० | ८०८.७२ | ८.१५ | ८१६.८७ |
| ३ | मुंबई उपनगर पूर्व | १०४० | ५३.९८ | ३१५६ | ७१.७५ | ४१९६ | १२५.७३ | ४.०९ | १२९.८२ |
| 4 | मुंबई उपनगर पश्चिम | ३०८७ | १४०.४४ | ३३१७ | १६०.७७ | ६४०४ | ३०१.२१ | ० | ३०१.२१ |
| 5 | ठाणे | २२६४ | ४३.०२ | २७३५ | ४४.०५ | ४९९९ | ८७.०७ | ७.८९ | ९४.९६ |
| 6 | पालघर | ६८५३ | २५१.९९ | ४५५७ | २३.८५ | ११४१० | २७५.८४ | ०.७९ | २७६.६३ |
| 7 | रायगड | १२५७ | ४४.०८ | ८८७३ | ३३१.५७ | १०१३० | ३७५.६५ | ७.७६ | ३८३.४१ |
| 8 | कल्याण | ८७१ | ३८.५७ | ४११७ | ४७.३ | ४९८८ | ८५.८७ | ८.०२ | ९३.८९ |
| 9 | भिवंडी | ५१० | १५.०८ | ५८३ | १३.२५ | १०९३ | २८.३३ | ३.३१ | ३१.६४ |
| 10 | सिधुदुर्ग | २३८२४ | ८८१.७९ | ११३०७ | ६११.८४ | ३५१३१ | १४९३.६३ | २.७३ | १४९६.३६ |
| 11 | रत्नागिरी | ४१७० | १३७.२८ | ४५९५ | १३४.५६ | ८७६५ | २७१.८४ | ४.३२ | २७६.१६ |
| | **Sub Total** | **४४६१३** | **१६५८.१** | **५८७८३** | **२१९५.७९** | **१०३४७६** | **३८५३.८९** | **४७.०६** | **३९००.९५** |
| 11 | पुणे | १२०८५ | २८५.२३ | ५११०२५ | १५८३.२३ | ५२३११० | १८६८.४६ | १७.२३ | १८८५.६९ |
| 12 | सांगली | १०९८६ | ७९२.८७ | १२६६९ | ७५०.२७ | २३६५५ | १५४३.१४ | ९.९८ | १५५३.१२ |
| 13 | इचलकरंजी | ८०७० | २२४.७३ | ६१४० | २९०.६३ | १४२१० | ५१५.३६ | ०.७ | ५१६.०६ |
| 14 | सातारा | १५५१ | ४९.९५ | ६५०६ | ८१.३३ | ८०५७ | १३१.२८ | ४.३२ | १३५.६ |
| 15 | सोलापूर | १५९९३ | ६०५.८७ | १८३७४ | ६९७.१ | ३४३६७ | १३०२.९७ | ७.३१ | १३१०.२८ |
| 16 | कोल्हापूर | २६६०२ | ६१५.९ | ११७१५ | ५१९.३६ | ३८३१७ | ११३५.२६ | ५.०७ | ११४०.३३ |
| 17 | बार्शी | ७१६ | १७१.५६ | २३०३ | १२०.१३ | ३०१९ | २९१.६९ | ०.१९ | २९१.८८ |
| | **Sub Total** | **७६००३** | **२७४६.११** | **५६८७३२** | **४०४२.०५** | **६४४७३५** | **६७८८.१६** | **४४.८** | **६८३२.९६** |
| 18 | नाशिक | १८५८ | ७९.५३ | २२२५ | ११७.०३ | ४०८३ | १९६.५६ | ८.६४ | २०५.२ |
| 19 | जळगांव | १११४ | ३७.३४ | ११४४ | ६०.२९ | २२५८ | ९७.६३ | ११.७२ | १०९.३५ |
| 20 | अहमदनगर | ७९९६ | २९७.८ | ३५०७० | १७५.६१ | ४३०६६ | ४७३.४१ | १२.९५ | ४८६.३६ |
| 21 | धुळे-नंदूरबार | २६२४ | ६६.२६ | ४५६१ | २३१.१८ | ६१८५ | २९७.४४ | ७.७९ | ३०५.२३ |
| 22 | मालेगाव | ४४९ | १८.६७ | ९८१ | ४९.४७ | १४३० | ६८.१४ | १.०५ | ६९.१९ |
| | **Sub Total** | **१३०४१** | **४९९.६** | **४३९८१** | **६३३.५८** | **५७०२२** | **११३३.१८** | **४२.१५** | **११७५.३३** |
| 23 | औरंगाबाद | २५५१६ | १०२०.२१ | ३४२६८ | १४७६.२२ | ५९७८४ | २४९६.४३ | २१.७१ | २५१८.१४ |
| 24 | नांदेड | ४८५६ | १९५.६८ | २२५२ | ८९.९४ | ७१०८ | २८५.६२ | ६१.८ | ३४७.४२ |
| 25 | लातूर | २२७५७ | ८८८.२५ | ४९९८३ | २००९.५९ | ७२७४० | २८९७.८४ | ३१.४१ | २९२९.२५ |
| 26 | जालना | १४६३० | ५१२.७ | १८०७५ | ९३७.५९ | ३२७०५ | १४५०.२९ | १२.८५ | १४६३.१४ |
| 27 | परभणी | ११८२२ | ५३८.३६ | ५७३० | ४२८.६९ | १७५५२ | ९६७.०५ | ११.६१ | ९७८.६६ |
| 28 | हिंगोली | ११२७ | ९५.८३ | २६२० | १०६.०२ | ४५४७ | २०१.८५ | ५०.९८ | २५२.८३ |

| .क्र. | जिल्हयाचे नाव | **३१ मार्च २०१८ पर्यंत झालेले लाभ वाटप** | | **दि.०१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंत झालेले लाभ वाटप** | | **३१.०३.२०१९ पर्यंतचे लाभ वाटप** | | **प्रशासकीय खर्च** | **उपकराच्या रक्कमेतून ३१ मार्च २०१९ पर्यंतचा झालेल्या एकुण खर्च तपशील** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | लाभ वाटपावरील खर्च | ०१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतचा प्रशासकीय खर्च | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 29 | बीड | ८२२८ | ३८३.२९ | २६१९७ | ४१२.६३ | ३४४२५ | ७९५.९२ | ३.४८ | ७९९.४ |
| 30 | उस्मानाबाद | २२८०५ | ११६१.२९ | १७१२४ | ९१६.२४ | ३९९२९ | २०७७.५३ | ६.५ | २०८४.०३ |
| **Sub Total** | | **११२५४१** | **४७९५.६१** | **१५६२४९** | **६३७६.९२** | **२६८७९०** | **१११७२.५** | **२००.३४** | **११३७२.८७** |
| 31 | नागपूर | ५७०६ | ३०३.४२ | ३३६१३ | १७५८.३४ | ३९३१९ | २०६१.७६ | ३२.११ | २०९३.८७ |
| 32 | अमरावती | ११७२० | ५३४.३१ | १७४०० | ९५५.४७ | २९१२० | १४८९.७८ | १२.२२ | १५०२ |
| 33 | भंडारा | ५६५१ | २२२.३ | २६२५ | १३१.४८ | ८२७६ | ३५३.७८ | ९.०६ | ३६२.८४ |
| 34 | गोंदीया | २०७७ | ९५.३२ | ३२९७ | १५१.०२ | ५३७४ | २४६.३४ | ५.५५ | २५१.८९ |
| 35 | चंद्रपूर | १०३१ | ९८.८८ | ६४२२ | २९८.१९ | ७४५३ | ३९७.०७ | ११.५७ | ४०८.६४ |
| 36 | अकोला | ५६१६ | ५३८.६१ | २१५० | १६२.४९ | ७७६६ | ७०१.१ | ३.५८ | ७०४.६८ |
| 37 | वाशिम | १६९७ | ५५.६४ | ९४४ | ५१.७४ | २६४१ | १०७.३८ | ३.४१ | ११०.७९ |
| 38 | वर्धा | ११०५८ | ४०७.११ | ८६५३ | ७८२.२३ | १९७११ | ११८९.३४ | ६.६४ | ११९५.९८ |
| 39 | गडचिरोली | १९८१ | ९०.९१ | १९९९ | ११४.१४ | ३९८० | २०५.०५ | ४.२८ | २०९.३३ |
| 40 | बुलडाणा | ११०९ | ७९.९१ | २८८३ | २७०.६८ | ३९९२ | ३५०.५९ | ९.३८ | ३५९.९७ |
| 41 | यवतमाळ | ९१५४ | ३८२.९५ | २२०९४ | १३४३.०५ | ३१२४८ | १७२६.०० | १२.२६ | १७३८.२६ |
| **Sub Total** | | **५६८००** | **२८०९.३६** | **१०२०८०** | **६०१६.८३** | **१५८८८०** | **८८२८.१९** | **११०.०६** | **८९३८.२५** |
| **एकूण** | | **३०३०७८** | **१२५०८.८** | **९२९८२५** | **५०६९२.३** | **१२३२९०३** | **६३२०१.१०** | **१८०४.३७** | **६५००५.४७** |

वरील प्रमाणे सन २०१८-२०१९ वर्षातील नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या, विविध कल्याणकारी योजनाचे लाभ वाटप झालेल्या बांधकाम कामगारांची संख्या, लाभ वाटपा वरील खर्च व प्रशासकीय खर्चाचा तपशील सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | वर्ष २०१७-१८ (संख्या/खर्च) | वर्ष २०१८-१९ (संख्या/खर्च) |
|---|---|---|---|
| १. | बांधकाम कामगारांची नोंदणी | ३.५५ लक्ष | ६.५७ लक्ष |
| २. | बांधकाम कामगारांना लाभ वाटप | १.१६ लक्ष | ९.२९ लक्ष |
| ३. | बांधकाम कामगारांच्या लाभ वाटपावरील खर्च | ६०.५२ कोटी | ५०६.९२ कोटी |
| ४. | प्रशासकीय खर्च | १७.९४ कोटी | १८.०४कोटी |
| ५. | प्रशासकीय खर्चाचे प्रमाण | २९.६४% | ३.५५% |
| ६. | मंडळाकडे जमा उपकर | १११७.०० कोटी | १२१०.९२ कोटी |

सन २०१८-१९ या वर्षाच्या लाभ वाटपावरील खर्चात अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) करीता राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृह निर्माण कार्यालय, बेलापूर, नवी मुंबई यांना वर्ग करण्यात आलेल्या रुपये १०४ कोटीचा समावेश आहे. तथापि, सदर खर्चाची आकडेवारी व जिल्हा कार्यालयांनी सादर केलेले उपयोगिता प्रमाणपत्र यातील आकडेवारी तपासणी करून प्रत्यक्ष् खर्चाच्या आकडेवारीत काही प्रमाणात बदल होऊ शकेल त्यानुसार आर्थिक वर्षातील खर्चाची आकडेवारी निश्चित करण्यात येईल व त्यानुसार सन २०१८-२०१९ या वर्षाचे लेखे तयार करण्यात येतील. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५१(२)/२०१९ :- सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील बांधकाम कामगारांची नोंदणी, लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या, लाभ वाटपावरील खर्च, प्रशासकीय खर्च, प्रशासकीय खर्चाचे प्रमाण व जमा उपकराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशील | वर्ष २०१८-१९ |
|---|---|---|
| १. | बांधकाम कामगारांची नोंदणी | ६.५७ लक्ष |
| २. | लाभ वाटप बांधकाम कामगारांची संख्या | ४.४६ लक्ष |
| ३. | बांधकाम कामगारांच्या लाभ वाटपावरील खर्च | रु.५११.१८ कोटी |
| ४. | प्रशासकीय खर्च | रु. १५.४६ कोटी |
| ५. | प्रशासकीय खर्चाचे प्रमाण | ३.०२% |
| ६. | मंडळाकडे जमा उपकर | रु.१२२८.३६ कोटी |

**वरील तपशीलाची मंडळाकडून नोंद घेऊन मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ०३:- बांधकाम कामगारांच्या व्याख्येत अंतर्भूत २१ कामांवरील बांधकाम कामगारांची नोंदणीकरीता अभियान राबविणे व विविध कल्याणकारी योजनेंतर्गत लाभ वाटप कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाने मागील वर्षात बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्यामध्ये विशेष नोंदणी अभियान राबविणे, मंडळाच्या विविध योजनांची प्रसार प्रसिध्दी करणे, शिबीर आयोजित करणे, नवीन योजना मंजूर करणे, विविध योजनांच्या लाभ वाटपाचे नियोजन करणे, अश्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. मागील वर्षभरात घेण्यात आलेल्या विशेष नोंदणी अभियानामध्ये ४.७८ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे. याशिवाय इतर उपायोजनांच्या माध्यमातून व कार्यालयात नियमित स्वरूपात एकूण १६.१० लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

माहे मार्च २०१९ पर्यंत मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या १६.१० लक्ष एवढी असून नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची संख्या सुमारे ९.२५ लक्ष इतकी आहे.

उपरोक्त नोंदणी अभियान अथवा अन्य पध्दतीने नोंदणीबाबत कार्यवाही करताना बांधकामाच्या व्याख्ये व्यतिरिक्त २१ बांधकाम कामांवर काम करत असलेल्या बांधकाम कामगारांची पुरेश्या प्रमाणात नोंदणी झालेली दिसून येत नाही.

**इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम २ (डी) नुसार बांधकामाची व्याख्या खालीलप्रमाणे आहे.**

इमारत, रस्ते, मार्ग, रेल्वे, ट्रॅमवेज, एअर फिल्डस, पाठबंधारे, जलनिस्सारण, बंधारा व नेव्हीगेशन काम, पूर नियंत्रणाचे काम (वादळामुळे जलनिस्सारणाच्या कामासहित), तेल व वायूची जोडणी टाकणे, विद्युत लाईन्स, वायरलेस, रेडिओ, टेलिव्हीजन, टेलिफोन, टेलिग्राफ आणि समुद्रापार दळणवळण, धरणे, कालवे, जलाशये, जलप्रवाह, बोगदे, पूल, सेतूप्रणाली, पाईपलाईन, टॉवर्स, कुलींग टॉवरर्स, पारेषाण टॉवर्स इत्यादींचे " बांधकाम फेरफार, दुरूस्ती, देखभाल किंवा पाडून टाकणे" या संदर्भातील कामे

बांधकाम कामगारांच्या नोंदणीमध्ये वाढ करण्याकरीता उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१८.०८.२०१७ रोजीच्या अधिसूचनेअन्वये बांधकामाच्या व्याख्येत खालील २१ नवीन बांधकामांचा समावेश करण्यात आलेला आहे.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१८.०८.२०१७ रोजीच्या अधिसूचनेअन्वये बांधकामाच्या व्याख्येत समावेश करण्यात आलेली २१ कामे खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| १. | दगड कापणे, फोडणे व दगडाचा बारीक चुरा करणे. |
| २. | लादी किंवा टाईल्स कापणे व पॉलिश करणे. |
| ३. | रंग, वार्निश लावण इत्यादीसह सुतारकाम |
| ४. | गटार व नळजोडणीची कामे |
| ५. | वायरिंग वितरण व तावदान बसवणे इत्यादीसह विद्युत कामे |
| ६. | अग्निशमन यंत्रणा बसविणे व तिची दुरूस्ती करणे. |
| ७. | वातानुकूलित यंत्रणा बसविणे व तिची दुरूस्ती करणे. |
| ८. | उद्वाहने, स्वयंचलित जिने इत्यादी बसविणे, |
| ९. | सुरक्षा दरवाजे उपकरणे इत्यादी बसविणे |
| १०. | लोखंडाच्या किंवा धातूच्या ग्रिल्स, खिडक्या, दरवाजे तयार करणे व बसविणे |
| ११. | जलसंचयन संरचनेचे बांधकाम करणे |
| १२. | सुतारकाम करणे, आभाशी छत, प्रकाश व्यवस्था, प्लास्टर ऑफ पेरिस यांतर्गत (सजावटीची कामे) |
| १३. | काच कापणे, काच रोगण लावणे व काचेची तावदाने बसविणे. |
| १४. | कारखाने अधिनियम १९४८ खाली समावेश नसलेल्या विटा, छपरांवरील कौल इत्यादी करणे. |
| १५. | सौर तावदाने इत्यादीसारखी उर्जाक्षम उपकरण बसविणे. |
| १६. | स्वयंपाकखोली सारख्या ठिकाणी वापरण्यासाठी मोडुलर (अधुनिक) युनिट बसविणे. |
| १७. | सिमेन्ट कॉक्रिटच्या साचेबध्द वास्तू इत्यादी तयार करणे व बसविणे. |
| १८. | जलतरण तलाव, गोल्फचे मैदान इत्यादीसह खेळ किंवा मनोरंजनाच्या सुविधांचे बांधकाम करणे. |
| १९. | माहिती फलक, रोड फर्निचर, प्रवाशी निवारे किंवा बसस्थानके, सिग्नल यंत्रणा इत्यादी बांधणे किंवा उभारणे. |
| २०. | रोटरीजचे बांधकाम करणे, कांरजे बसविणे इत्यादी |
| २१. | सार्वजनिक उद्याने, पदपथ, रमणीच भू-प्रदेश इत्यादींचे बांधकाम |

सदर अभियानासाठी खालील प्रपत्रात नमूद प्रमाणे जिल्हानिहाय नोंदणी केंद्र व लाभार्थी नोंदणीचे लक्षांक प्रस्तावित करण्यात येत आहे.

## बांधकामाच्या व्याख्येशिवाय २१ बांधकाम कामांवरील बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे लक्षांक व प्रस्तावित नोंदणी केंद्रांची संख्या दर्शविणारे प्रपत्र

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | ३१.०३.२०१९ अखेर एकुण नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या | ३१ मार्च २०१९ अखेर सक्रिय (जिवीत) नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या | २१ बांधकाम कामांवरील बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे लक्षांक | प्रस्तावित नोंदणी केंद्रांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई शहर | १९९६१ | १६९९७ | १०००० | ०२ |
| 2 | मुंबई उपनगर पूर्व | १७८१३ | ४१९८ | १०००० | ०२ |
| 3 | मुंबई उपनगर पश्चिम | ३६८९९ | २९८८ | १०००० | ०२ |
| 4 | ठाणे | ३४०९५ | १४००२ | १०००० | ०२ |
| 5 | पालघर | ७८६५ | ३६१३ | १०००० | ०२ |
| 6 | रायगड | २२०३१ | ९७९२ | १०००० | ०२ |
| 7 | कल्याण | १३४९१ | ८१६० | ५००० | ०१ |
| 8 | भिवंडी | ६६४० | २७५७ | ५००० | ०१ |
| 9 | सिधुदुर्ग | २५६८९ | १८११६ | १०००० | ०२ |
| 10 | रत्नागिरी | २३९९९ | १३७७९ | १०००० | ०२ |
| 11 | पुणे | १४८३७२ | ३६३८३ | २०००० | ०४ |
| 12 | सांगली | ४९१४५ | १३२५७ | १०००० | ०२ |
| 13 | इचलकरंजी | २५१५६ | १४६७८ | १०००० | ०२ |
| 14 | सातारा | १२४८४ | १००४० | १०००० | ०२ |
| 15 | सोलापूर | ८९४८३ | ३५५९९ | १५००० | ०३ |
| 16 | कोल्हापूर | ७०१६५ | १४८२७ | १५००० | ०३ |
| 17 | बार्शी | ५६३६ | ४३२४ | ५००० | ०१ |
| 18 | नाशिक | २७८२८ | १८७५६ | १५००० | ०३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 19 | जळगांव | २०६९३ | १२३११ | १०००० | ०२ |
| 20 | अहमदनगर | ५१४४७ | १८१४० | १५००० | ०३ |
| 21 | धुळे-नंदूरबार | २१४९८ | १२०४९ | १५००० | ०३ |
| 22 | मालेगाव | ९१७३ | ४७७० | ५००० | ०१ |
| 23 | औरंगाबाद | ७२३४४ | २०१२१ | २०००० | ०४ |
| 24 | नांदेड | २४५६५ | १४७६१ | १०००० | ०२ |
| 25 | लातूर | ९९५८१ | ५५६९६ | २०००० | ०४ |
| 26 | जालना | ५०६५८ | ३१२४३ | १५००० | ०३ |
| 27 | परभणी | ४२५६७ | १९८४० | १५००० | ०३ |
| 28 | हिंगोली | २३०४६ | २०८०१ | १०००० | ०२ |
| 29 | बीड | २९२०४ | ११८०४ | १५००० | ०३ |
| 30 | उस्मानाबाद | ४२३९९ | ४२३९९ | १५००० | ०३ |
| 31 | नागपूर | ८८६८६ | ७४७१२ | २०००० | ०४ |
| 32 | अमरावती | ६६४४५ | ६०३३६ | २०००० | ०४ |
| 33 | भंडारा | ३५७३२ | ३३९१९ | १०००० | ०२ |
| 34 | गोंदीया | ५५४५७ | ४३२६२ | १०००० | ०२ |
| 35 | चंद्रपूर | ३४४५७ | २९६४५ | १०००० | ०२ |
| 36 | अकोला | १९७१९ | १३३३७ | १०००० | ०२ |
| 37 | वाशिम | १५२२८ | १२१८९ | १०००० | ०२ |
| 38 | वर्धा | ६२०८१ | ४९०७५ | १५००० | ०३ |
| 39 | गडचिरोली | १८०६८ | १६६२० | १०००० | ०२ |
| 40 | बुलडाणा | १६९५० | १७३३२ | १०००० | ०२ |
| 41 | यवतमाळ | ७३८६९ | ७०९५५ | २०००० | ०४ |
| **एकूण** | | **१६,१०,६११** | **९,२७,५८३** | **५,००,०००** | **१००** |

सदर नोंदणी अभियानात स्थापन करण्यात येणाऱ्या नोंदणी केंद्रासाठी आवश्यक मनुष्यबळ कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी, कार्यालयातील कर्मचारी तसेच मनुष्यबळ अपुरे पडल्यास मे. अँगल अॅडव्हर्टायझिंग प्रा.लि. यांचेमार्फत मनुष्यबळाचा

पुरवठा करण्यात येईल. सदर संस्थेच्या कार्यादेशास मंडळाच्या दि.२४.०१.२०१९ रोजीच्या बैठकीतील मान्यतेने ०१ वर्षाची मुदतवाढ यापूर्वीच देण्यात आलेली आहे. प्रस्तावित विशेष नोंदणी अभियान दि. १५ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येईल व २१ बांधकाम कामांवरील बांधकाम कामगारांची नोंदणी, तसेच मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाची कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. यापुढे सादर करताना मंडळ सचिवांनी असेही सादर केले की, ज्या जिल्हयामध्ये बांधकाम कामाच्या व्याख्येतील मूळ कामावरील बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली नसेल त्या कामावरील बांधकाम कामगारांची नोंदणी करणेबाबतही क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात येतील तसेच प्रति ०२ नोंदणी केंद्रासाठी ०१ वाहन याप्रमाणे अभियान पूर्व तयार व अभियान कालावधीसाठी वाहने भाडयाने घेण्यास अनुमती देणे प्रस्तावित आहे. तसेच अभियानावरील खर्च अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत खर्ची टाकणे प्रस्तावित आहे. याबाबत, चर्चा करताना मा. प्रधान सचिव यांनी सूचित केले की, सदर अभियान कालावधीत बांधकाम कामगारांची नोंदणी शिवाय नोंदीत बांधकाम कामगारांच्या नुतनीकरणाचीही कार्यवाही करण्यात यावी. तसेच, लाभ वाटपाचे अर्ज स्विकारण्यात यावे. मंडळ सदस्य श्री.कुटासकार यांनी असेही सूचित केले की, सदर बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र कोण देईल याबाबत चर्चेत सहभागी होताना मा. मंत्री महोदय, कामगार यांनी सूचित केले की, बांधकामाचे ठेकेदार, ग्रामसेवक, नगरपालिका, महानगरपालिकांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांचेकडून ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त होत नसल्यास संबंधित संस्थेमार्फत/ असोसिएशनमार्फत ९० दिवसांचे प्रमाणपत्र प्राप्त करावे. मा. कामगार आयुक्त, यांनी असेही सूचित केले की, नोंदणी अधिकारी कामाच्या ठिकाणी जाऊन नोंदणी करीत असल्याने शासनाने नोंदणी अधिकारी म्हणून घोषीत केलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी तपासणी करून ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्यास हरकत नाही. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५१ (३)/२०१९ :- बांधकाम कामाच्या मूळ व्याख्येतील कामे व उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१८.०८.२०१७ रोजीच्या अध्यादेशाद्वारे बांधकामाच्या व्याख्येत समावेश करण्यात आलेल्या २१ कामांवरील बांधकाम कामगारांच्या नोंदणी करीता दि. १५ जून ते १४ ऑगस्ट या कालावधीत अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर अभियानात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.**

१. **बांधकाम कामाच्या मूळ व्याख्येतील कामे व उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१८.०८.२०१७ रोजीच्या अध्यादेशाद्वारे बांधकामाच्या व्याख्येत समावेश**

करण्यात आलेल्या २१ कामांवरील बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात यावी.

२. ४१ जिल्हा कार्यालयांना ५ लक्ष बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे लक्षांक निर्धारित करण्यात यावे.

३. नोंदणीकरीता १०० नोंदणी केंद्रांची स्थापना करण्यात यावी.

४. बांधकामाच्या व्याख्येत समाविष्ट २१ बांधकाम कामांवरील कामाचा ठिकाणी काम करत असलेल्या कामगारांना ठेकेदार, ग्रामसेवक नगरपालिका, महानगरपालिकांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांचेकडून ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त होत नसल्यास त्यांच्या नोंदणीकृत संस्थेमार्फत/ असोसिएशन मार्फत ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात यावे किंवा उदयोग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०२.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयात नमुद नोंदणी अधिकारी यांनी सदर कामाच्या ठिकाणी भेट देऊन, तपासणी अंती संबंधीत २१ बांधकाम कामांवर काम करणा-या कामगारास ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे

५. अभियान कालावधीत ज्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण झालेले नाही त्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण करण्यात यावे.

६. नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांकरीता सादर केलेले लाभाचे अर्ज स्विकारण्यात यावे व लाभ वाटपाची कार्यवाही करण्यात यावी.

७. नोंदणी अभियानाकरीता आवश्यक साहित्य, मोबाईल व्हॅन व प्रमोटर्स पुरवठयाचे आदेश मे. ॲंगल ॲडव्हर्टायझिंग, पुणे या संस्थेस देण्यात यावे.

८. सदर विशेष नोंदणी अभियानाचा खर्च अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत मंजूर अंदाजपत्रकीय निधी मधून भागविण्यात यावा.

असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०४ :- मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना पुढे चालू ठेवण्याबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की , महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेनंतर मंडळाच्या विविध बैठकांमध्ये कल्याणकारी योजना राबविणे संदर्भात निर्णय घेण्यात आले. नोंदीत बांधकाम कामगारांसाठी मंडळाने मंजूर केलेल्या योजनांचे प्रस्ताव वेळोवेळी शासनास सादर केलेले होते. शासन मान्यतेनुसार योजना राबविणेबाबत क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले होते. क्षेत्रिय कार्यालयांना योजना अंमलबजावणीबाबत लाभ वाटपाची कार्यपध्दती (SOP) कळविण्यात आलेली आहे. ज्यामध्ये लाभार्थी पात्रता, लाभाचे अर्ज, अर्जासोबत सादर करावयाचे दस्तऐवज व पात्र लाभार्थ्यांना द्यावयाच्या लाभार्थी रक्कम/ लाभ याबाबतचा तपशील कळविण्यात आला होता. सद्यस्थितीत मंडळाकडून नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, लाभाची रक्कम, आवश्यक कागदपत्रे दि.३१.०३.२०१९ पर्यंत योजनानिहाय लाभ वाटप लाभार्थ्यांची संख्या खालील प्रपत्रात नमूद करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | योजना | लाभाची रक्कम रूपये | कागदपत्रे (छायांकित प्रती) | दि.३१.०३.२०१९ अखेर लाभ वाटप करण्यात आलेल्या बांधकाम कामगारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदीत पुरूष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस दोन जीवीत अपत्यांपर्यंत नैसर्गिक प्रसूतीसाठी रू.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसूतीसाठी रू.२०,०००/- आर्थिक सहाय्य<br>(अ) नैसगिक प्रसूतीसाठी | रु. १५,०००/-<br>रु. २०,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३.बँकेचे पासबुक<br>४. रेशन कार्ड<br>५.प्रसूतिबाबत सक्षम वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र<br>६.ग्रामपंचायत/नगरपरिषद/महानगर पालिका यांचेकडून काढलेले बाळाचे जन्म प्रमाणपत्र<br>७. कामगारांच्या नावे आधारकार्ड | ८३२८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (ब) शस्त्रक्रियेद्वारे प्रसूतिसाठी | | ८.कामगाराच्या पत्नीचे आधाराकार्ड/ मतदान कार्ड/ पॅन कार्ड इ.<br>९.कामगाराच्या पत्नीचे फोटो<br>१०. सक्षम वैद्यकीय अधिका-यांनी दिलेले प्रसूतीचे प्रमाणपत्र<br>११. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | |
| २. | नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रती शैक्षणिक वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणा-या २ पाल्यांना इ. १ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी २५००/- किंवा इ. ८वी ते १० वी साठी प्रतिवर्षी ५०००/- एवढे शिक्षण सहाय्य | रू २५००/ -<br>रू. ५०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. शाळेमध्ये शिक्षण घेत असल्याचा पुरावा बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>६. ७५% हजेरीबाबत शाळेचा दाखला/ हजेरीपत्रक<br>७. रेशन कार्ड<br>८. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | ३५४२३ |
| ३. | बांधकाम कामगाराच्या २ पाल्यांना इ.१० वी व १२ वी मध्ये ५० % किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रू.१०,०००/- एवढे प्रोत्सहानात्मक शैक्षणिक सहाय्य | रु.१०,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. १० वी व १२वी ची गुणपत्रिका<br>६. शिक्षण घेत असल्याबाबतचा | २८७१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | शाळा/ कॉलेजचा दाखला बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>७. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८.पाल्याचे शाळेचे ओळखपत्र/ कॉलेजचे ओळखपत्र<br>९. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | |
| ४. | नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वीच्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.१०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य | रू.१०,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. १० वी व ११ वी ची गुणपत्रिका<br>६. शिक्षण घेत असल्याबाबतचा शाळा/ कॉलेजचा दाखला बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>७. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८.पाल्याचे शाळेचे ओळखपत्र/ कॉलेजचे ओळखपत्र<br>९. ११ वी १२ वी शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याचा पुरावा<br>१०. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | ९८७५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | बांधकाम कामगारांच्या २ पाल्यांना अथवा पुरूष कामगारांच्या पत्नीस प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रू.२०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य | रु.२०,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. शिक्षण घेत असल्याबाबतचा शाळा/ कॉलेजचा दाखला बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>६.मागील शैक्षणिक इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक/ प्रमाणपत्र<br>७. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८.पाल्याचे शाळेचे ओळखपत्र/ कॉलेजचे ओळखपत्र<br>९. शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या पावत्या व पुस्तके व शैक्षणिक सामुग्री खरेदीच्या पावत्या सोबत जोडणे.<br>१०. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | ८८७६ |
| ६. | नोंदित लाभार्थी कामगाराच्या २ पाल्यांना अथवा पुरूष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इ. साठी | वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.१,००,०००/- अभियंत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.६०,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. शिक्षण घेत असल्याबाबतचा शाळा/ कॉलेजचा | ४१६० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रती शैक्षणिक वर्षी वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.१,००,०००/- व अभियंत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.६०,०००/- इतके शैक्षणिक सहाय्य. | | दाखला बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>६.मागील शैक्षणिक इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक/ प्रमाणपत्र<br>७. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८.पाल्याचे शाळेचे ओळखपत्र/ कॉलेजचे ओळखपत्रं<br>९. शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या पावत्या व पुस्तके व शैक्षणिक सामुग्री खरेदीच्या पावत्या सोबत जोडणे.<br>१०. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | |
| ७. | नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना पदविका शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रू.२०,०००/- आणि पदव्युत्तर पदविका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रू.२५,०००/- इतके शैक्षणिक सहाय्य | पदविका अभ्यासक्रमाकरीता रु.२०,०००/- पदव्युत्तर पदविका रू.२५,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. १० वी १२, पदवीका, पदव्युत्तर च्या गुणपत्रिका<br>६. शिक्षण घेत असल्याबाबतचा शाळा/ कॉलेजचा दाखला बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>७.मागील शैक्षणिक इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक/ प्रमाणपत्र | ३९१४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ८.कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>९.पाल्याचे शाळेचे ओळखपत्र/ कॉलेजचे ओळखपत्र<br>१०. पदविकेमध्ये व पदव्युत्तर पदविकामध्ये प्रवेश घेतलेल्या पावत्या जोडणे<br>११. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | |
| ८. | एका मुलीच्या जन्मानंतर नोंदीत लाभार्थी कामगार अथवा नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पती/ पत्नीने कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रू.१,००,०००/- मुदत बंद ठेव. | रु. १,००,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५.सक्षम वैद्यकीय अधिका-याने दिलेले शस्त्रक्रियेबाबतचे प्रमाणपत्र<br>६. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>७.पत्नीच्या नावे आधारकार्ड/ मतदान कार्ड/पॅन् कार्ड इ.<br>८. अर्जदाराचे मुलीशी असलेले नाते दर्शविणारा पुरावा (रेशनाकर्ड इ.)<br>९.अर्जदारास एक कन्या अपत्य पेक्षा जास्त अपत्य नसल्याचा पुरावा | ०४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | १०. सर्व सत्यप्रतीवर स्वतः साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | |
| ९. | नोंदीत बांधकाम कामगारास ७५ टक्के किंवा अधिक कायमचे अपंगत्व आल्यास रू.२,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य (तथापि, नोंदीत बांधकाम कामगाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपूर्ती अथवा रू.२,००,०००/- आर्थिक सहाय्यापैकी कोणताही एकच लाभ अनुज्ञेय राहील) | रु.२,००,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५.कामगारास ७५% किंवा अधिक अपंगत्व असल्याचे सक्षम वैद्यकीय अधिका-याचे/ वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र व संपूर्ण वैद्यकीय उपचाराच्या कागदपत्रांच्या प्रती.<br>६. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>७. सर्व सत्यप्रतीवर स्वतः साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे. | ३९ |
| १०. | नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या नामनिर्देशित वारसास अंत्यविधीसाठी रू.१०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य | रू.१०,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. मृत बांधकाम कामगाराच्या नामनिर्देशित वारसाचे बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. सक्षम वैद्यकीय अधिका-याने दिलेला मृत्यू दाखला<br>६. अर्जदार नामनिर्देशित वारस असल्याचा पुरावा | ७२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ७. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८ अर्जदाराच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>९. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | |
| ११. | लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा स्त्री कामगाराच्या विधुर पतीस प्रतीवर्षी रू.२४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य् (पाच वर्षासाठी) | रू.२४,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. मृत बांधकाम कामगाराच्या पती/ पत्नीचे बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. सक्षम वैद्यकीय अधिका-याने दिलेला मृत्यू दाखला<br>६. अर्जदार मृत कामगाराचा पती/ पत्नी असल्याचा पुरावा<br>७. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८. अर्जदाराच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>९. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | ८१६ |
| १२. | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास | रु.५,००,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र | १८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | त्याच्या कायदेशीर वारसास रु. ५,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | | ३. मृत बांधकाम कामगाराच्या कायदेशीर वारसाचे बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. सक्षम वैद्यकीय अधिका-याने दिलेला मृत्यू दाखला<br>६. अर्जदार कायदेशीर वारस असल्याचा पुरावा<br>७. बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्याबाबतचा पुरावा<br>८. पंचनामा झालेले कागदपत्र (मृत्यूच्या जागेवर काम करत असताना)<br>९. कामगारांच्या नावे आधारकारड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>१०. अर्जदाराच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>११. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | |
| १३. | लाभार्थी कामगार व त्याच्या कुटूंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रू.१,००,०००/- एवढे वैद्यकीय सहाय्य (एका सदस्यास केवळ एकदाच | रु.१,००,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (रेशन कार्ड/ लाईट बील, इ.) | ३७८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आणि कुटूंबातील दोन सदस्यांपर्यंत मर्यादित) तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल. | | ५.सक्षम वैद्यकीय अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र व संपूर्ण वैद्यकीय उपचाराच्या कागदपत्रांच्या सत्य प्रती<br>६. आजारी /रोगी व्यक्तीचे अर्जदाराशी नाते दर्शविणारा पुरावा<br>७. कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | |
| १४. | संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परिपूर्ती | शुल्क रक्कम | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. MS-CIT कोर्स प्रमाणपत्र व शुल्काची पावती<br>६. अर्जदाराचे पाल्याशी असलेले नाते दर्शविणारा पुरावा<br>७. अर्जदाराचे नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८.पाल्याचे शाळेचे ओळखपत्र/ कॉलेजचे/ संस्थेचे ओळखपत्र<br>९. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | ४२६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५. | नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी रू.३०,०००/- अनुदान | रू.३०,०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. मॅरेज सर्टिफिकेट/लग्नपत्रिका / ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका प्रमाणपत्र/ न्यायालयीन प्रमाणपत्र<br>६. प्रथम विवाह असल्याबाबत शपथपत्र<br>७. अर्जदाराच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/ पासबुक इ.<br>८. लग्नाचा (वर वधूचा) एकत्रित फोटा<br>९. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | १७५३ |
| १६. | दिनांक ३१ ऑगस्ट २०१४ नोंदणी जिवित असलेल्या सर्व नोंदित बांधकाम कामगारांना दैनंदिन गरजेच्या वस्तु खरेदीसाठी प्रति कामगाररु.३०००/ (रू.तीन हजारफक्त एवढे अर्थसहाय्य. | रू.३०००/- | १. नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करणे व स्वाक्षरी करणे | १४३४४० |
| १७. | नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यांना व्यक्तिमत्व विकास पुस्तक संचाचे वाटप. | पुस्तक संच | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र | ७९४४७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांकरीता व्यसनमुक्ती केंद्रांतर्गत उपचाराकरीता नोंदीत बांधकाम कामगारास रू.६०००/- इतके अर्थसहाय्य | रू.६०००/- | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. शासकीय/निमशासकीय, व्यसनमुक्ती केंद्रातून उपचार घेतल्याचे शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र | -- |
| १९. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना बांधकामासाठी उपयुक्त/ आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरीता रू.५०००/- अर्थसहाय्य देणेबाबत | रू.५०००/- | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.) | २६९८६८ |
| २० | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना लागू करणे. | रू.२,००,०००/- | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.) | -- |
| २१ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागू करणे. | रू.२,००,०००/- | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.) | -- |
| २२ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार | प्रशिक्षण | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र | ३९१३८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कल्याणकारी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना पूर्व शिक्षण ओळख योजना लागू करणे. | | | |
| २३ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करणेबाबत | रू.१,५०,०००/- प्रति कुटूंब (१+५) | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र | -- |
| २४ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रू.२ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत. | रू.२,००,०००/- | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. मृत बांधकाम कामगारांच्या कायदेशीर वारसाचे बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. अर्जदार कायदेशीर वारस असल्याचा पुरावा<br>६. मृत कामगारांच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड<br>७. कायदेशीर वारसाच्या नावे आधारकार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड | ३२ |
| २५ | अटल बांधकाम कामगार आवास योजना- शहरी | रू.२,००,०००/- | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.) | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ५. बांधकाम कामगारांच्या नावे अथवा पती/ पत्नीच्या नावे स्वत:ची सदनिका नसेल अशा बांधकाम कामगारांचे रू.१००/- च्या मुद्रांकावर लेख प्रमाणक (Notary) करणे. | |
| २६ | अटल बांधकाम कामगार आवास योजना- ग्रामीण | रू.२,००,०००/- | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. बांधकाम कामगार यांच्या स्वत:च्या अथवा पती/ पत्नीच्या नावे घर नसल्याचे हमीपत्र | -- |
| २७ | नोंदीत बांधकाम कामागारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रू.६.०० लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रू.२.०० लक्ष मंडळामार्फत देणेबाबत. | रू.२,००,०००/- | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र<br>३. बँकेचे पासबुक<br>४. रहिवासी पुरावा (राशन कार्ड/ लाईट बील, इ.)<br>५. बांधकाम कामगारांच्या कर्जाचा विमा<br>६. बांधकाम कामगार यांच्या स्वत:च्या अथवा पती/ पत्नीच्या नावे घर नसल्याचे हमीपत्र | -- |
| २८ | नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षेसाठी सुरक्षा संच (Safety Kit) पुरविणेबाबत | सुरक्षा संच | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र | १९२०९७ |
| २९ | नोंदीत बांधकाम कामगारांना अत्यावश्यक | अत्यावश्यक संच | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र | १९२१०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वस्तू संच (Essential Kit) पुरविणेबाबत | | | |
| ३० | मध्यान्ह भोजन योजना | मध्यान्ह भोजन | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र | -- |
| ३१ | बांधकाम कामगारांची बांधकामाच्या ठिकाणी आरोग्य तपासणी करणेबाबत | आरोग्य तपासणी | १.नोंदणी पावती<br>२. मंडळाचे ओळखपत्र | -- |
| | **एकूण** | | | **१२,५३,३६२** |

मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व मा. कामगार आयुक्त, यांच्या उपस्थितीत दि.१९.०३.२०१९ रोजी नवी मुंबई येथे संपन्न् क्षेत्रिय कार्यालयाच्या आढावा बैठकीत मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा आढावा घेताना सदर योजनांपैकी काही योजनांमध्ये लाभ वाटप होऊ शकले नाही तर काही योजनांमध्ये अत्यल्प लाभ वाटप दिसून येतो. या संदर्भात चर्चा करताना सदर विविध कल्याणकारी योजनांचा मंडळ स्तरावर आढावा घेऊन कोणत्या योजना पुढे चालू ठेवायच्या याबाबत प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन सदरचा विषय मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला आहे.

याविषयी मा. कामगार आयुक्त यांनी मत व्यक्त केले की, मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांपैकी हत्यारे व अवजारे खरेदी करीता रु. ५०००/- चे अर्थसहाय्य या योजनेमुळे बांधकाम कामगार नसलेले कामगारही नोंदणी करीता अर्ज करीत आहे. बांधकाम कामगार नसलेल्या कामगारांची नोंदणी टाळण्यासाठी सदर योजना बंद करणे योग्य राहील. याविषयी मत व्यक्त करतांना मा. अध्यक्ष यांनी नमूद केले की, अशी वस्तुस्थिती नाही. सदर योजनेमुळे बांधकाम कामगारांची नोंदणी वाढत आहे व बांधकाम कामगारांना आर्थिक सहाय्य सुध्दा मिळत आहे. सदर योजना तुर्तास बंद करु नये.

अन्य योजनांपैकी पुस्तक संच वाटप, एका मुलीच्या जन्मानंतर शस्त्रक्रिया केल्यास रु. १०००००/- एवढया रकमेची मुदतठेव अशा योजना बंद करण्याबाबत विचार व्हावा.

मा. प्रधान सचिव कामगार विभाग, यांनी सुचित केले की, व्यसनमुक्ती केंद्राअंतर्गत उपचाराकरीता रु. ६०००/- अर्थसहाय्याच्या योजनेत अद्याप लाभ वाटप झालेला नाही सदर योजना बंद करण्यात यावी.

मा. अध्यक्ष यांनी असे ही सुचित केले की, बांधकाम कामगारांच्या अपघातात ७५ टक्के पेक्षा जास्त अपंगत्व आल्यास देण्यात येणारे अर्थसहाय्याच्या अटीमध्ये बदल करुन ५० टक्के पेक्षा जास्त अपंगत्व आल्यास रु. २.०० लक्ष अर्थसहाय्य देणे योग्य राहील.

तसेच, सद्यस्थितीत वय वर्ष ५१ ते ६० या वयोगटातील नोंदित बांधकाम कामगारांचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास रु. २.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात येते असा लाभ अन्य वयोगटातील लाभार्थ्याचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास त्यांच्या वारसांना मिळत नाही. याबाबत, खुलासा करतांना मंडळ सचिवांनी सादर केले की, नोंदित बांधकाम कामगारांच्या नैसर्गिक मृत्युनंतर वारसांना अर्थसहाय्यांच्या दोन स्वतंत्र योजना राबविण्यात येत आहे. वय वर्ष १८ ते ५० या वयोगटातील नोंदित बांधकाम कामगारांचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास व ते प्रधानमंत्री सुरक्षा योजनेचे सभासद असल्यास सदर बांधकाम कामगारांच्या वारसाला रु. २.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य मिळते व वय वर्ष ५१ ते ६० या वयोगटातील नोंदित बांधकाम कामागरांचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास मंडळाच्या योजनेअंतर्गत रु. २.०० लक्षचे अर्थसहाय्य देण्यात येते. यावर मा. अध्यक्षांनी मत व्यक्त केले की,

मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार प्रधानमंत्री सुरक्षा योजनेचे सभासद होत नसल्याने त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही व मंडळाच्या योजनेचा ही लाभ मिळत नाही. त्यामुळे मंडळाची योजना १८ ते ६० वर्ष या वयोगटातील सर्व बांधकाम कामगारांसाठी लागू करण्यात यावी.

**ठराव क्र. ५१(४)/२०१९ :- मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या एकूण ३२ विविध कल्याणकारी योजनांचा आढावा घेण्यात आला. सदर आढावामध्ये खालील प्रमाणे योजना बंद करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.**

| अ.क्र. | योजनेचे नाव | निर्णय |
|---|---|---|
| १. | एका मुलीच्या जन्मानंतर नोंदीत लाभार्थी कामगार अथवा नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पती/ पत्नीने कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे १८वर्षापर्यंत रू.१,००,०००/- मुदत बंद ठेव. | सदर योजना बंद करण्यात यावी. |
| २. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांकरीता व्यसनमुक्ती केंद्रांतर्गत उपचाराकरीता नोंदीत बांधकाम कामगारास रू.६०००/- इतके अर्थसहाय्य | सदर योजना बंद करण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यांना व्यक्तिमत्व विकास पुस्तक संचाचे वाटप. | सदर योजनेचा लाभ एकाच वेळी देणे अभिप्रेत होते. सदर योजना बंद करण्यात यावी. |
| ४. | दिनांक ३१ ऑगस्ट २०१४ रोजी नोंदणी जिवित असलेल्या सर्व नोंदित बांधकाम कामगारांना दैनंदिन गरजेच्या वस्तु खरेदीसाठी प्रति कामगार रु.३०००/ (रू.तीन हजार फक्त एवढे अर्थसहाय्य.) | या योजनेचा कालावधी तीन वर्षाचा होता. सदर कालावधी यापूर्वीच संपुष्टात आल्याने सदर योजना बंद करण्यात यावी. |

तसेच, मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या खालील योजनेमध्ये सुधारणा करण्यात यावी.

| क्र. | योजनेचे नाव | निर्णय |
|---|---|---|
| १. | नोंदीत बांधकाम कामगारास ७५ टक्के किंवा अधिक कायमचे अपंगत्व आल्यास रू.२,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य (तथापि, नोंदीत बांधकाम कामगाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपूर्ती अथवा रू.२,००,०००/- आर्थिक सहाय्य यापैकी कोणताही एकच लाभ अनुज्ञेय राहील) | नोंदीत बांधकाम कामगारास ७५ टक्के किंवा अधिक कायमचे अपंगत्व आल्यास या मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.<br>नोंदीत बांधकाम कामगारास ५० टक्के किंवा अधिक कायमचे अपंगत्व आल्यास रू.२,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य देणे. |
| २. | नोंदित बांधकाम कामगारांचा (५१ ते ६० वर्ष वयोगटातील) नैसर्गिक मृत्यू झाल्यास रु. २.०० लक्ष अर्थसहाय्य देणे. | प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना बंद करुन नोंदित बांधकाम कामगारांचा (१८ ते ६० वर्ष वयोगटातील) नैसर्गिक मृत्यु झाल्यास रु. २.०० लक्ष अर्थसहाय्य देणे. |

मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या एकूण ३२ विविध कल्याणकारी योजनांचा आढावा घेवून वरीलप्रमाणे ६ योजनांबाबत निर्णय घेण्यात आला. सदर निर्णयानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०५ :- नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तूंच्या संचाचे वितरण करणे.**

मंडळ सचिवांनी असे सादर केले की, मंडळाच्या दि. २४.१०.२०१६ रोजीच्या बैठकीत पारित ठरावानुसार मा. अध्यक्ष यांनी बांधकाम कामगारांना विशेष बाब म्हणून रु. ५,०००/- व गृहपयोगी भेटवस्तू देण्याबाबतचा प्रस्ताव मांडला होता. याबाबत सहसचिव कामगार यांनी दोन वर्षापूर्वी बांधकाम कामगारांना गृहोपयोगी वस्तु खरेदी करण्यासाठीरु.३,०००/- देण्यात येत होते. सध्याच्या महागाईमुळे सदरची रक्कम वाढवून रु. ५,०००/- देण्यात यावे, असे मत मांडले. यावर मा.अध्यक्ष यांनी रु. ५,०००/- गृहोपयोगी वस्तू खरेदीसाठी व रु.५०००/- विशेष बाब म्हणून स्वतंत्रपणे देण्याबाबत प्रस्ताव मांडला होता. सदर प्रस्तावावर मा.मंत्री (कामगार) यांचेसमोर चर्चा करुन पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे मा. अध्यक्ष यांनी सुचित केले होते.

मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तूस्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर रोख स्वरूपात थेट लाभार्थींच्या बँक खात्यात करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानूसार शासनाव्दारे थेट लाभ हस्तांतरण करण्याबाबत (DBT) प्रक्रियेवर मोठया प्रमाणात भर देण्यात आलेला असून शासनाच्या व शासनाच्या अधिपत्याखालील महामंडळे यांचकडून विविध कल्याणकारी योजनांमधून देण्यात येणारे लाभ हे लाभार्थ्यांना थेट (DBT) पध्दतीने त्यांच्या बँक खात्यामध्ये रोखीने जमा करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. सदर प्रक्रियेमूळे होणारे लाभ हे लाभार्थ्यांना मिळण्याची शाश्वती असते. त्यामूळे वरील योजनेचे लाभ (DBT) पध्दतीने देण्याबाबत चर्चा करण्यात आली होती.

सदर चर्चेत सहभागी होतना मा. अध्यक्ष यंनी यापुर्वी मंडळात गृहपयोगी वस्तू खरेदीसाठी रु. ३०००/- वाटप केले होते. परंतू, सदर रक्कम रोखीने दिल्यास कामगार आवश्यक वस्तू खरेदी करेलच याची खात्री देता येत नाही. म्हणून गृहपयोगी वस्तू खरेदीसाठी नव्याने योजना करून त्यास शासनाची मंजूरी घेता येईल. त्यावर मा. कामागर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर रक्कमेचा उपयोग करून कामगाराने कोणकोणत्या वस्तू खरेदी करणे अपेक्षित आहे हे मंडळाला ठरवावे लागेल. त्यावर मा. अध्यक्ष यांनी सदर रक्कमेतून कूकर, ताट, वाटया, ग्लास, गॅस कनेक्शन इ. वस्तू खरेदी करता येतील असे सांगितले.त्यावर मा. मंत्री महोदय यांनी मंत्रीमंडळाच्या उक्त निर्णयाचा सखोल अभ्यास करून मंडळाच्यापुढील बैठकीत याबाबत चर्चा करण्यात यावी, असे सूचित केले होते.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंत्रीमंडळाने विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तू स्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरूपात थेट लाभार्थीच्या बँक खात्यात करणेबाबत घेतलेल्या निर्णयाचा सखोल अभ्यास करून व त्यामधील खरेदी प्रक्रियेची कार्यप्रणाली समजावून घेवून त्यानुसार गृहपयोगी वस्तू खरेदीचा प्रस्ताव पुढील बैठकीत चर्चेस घेण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावास अनुसरुन महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तू स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबत दिनांक ०५.१२.२०१६ व ०३.०३.२०१७ रोजी निर्गमित शासन निर्णयाचे अवलोकन केले असता सदर शासन निर्णयात शासकीय विभाग/ स्थानिक स्वराज्य संस्था/ मंडळे/ महामंडळे यांनी कल्याणकारी योजनेअंतर्गत कोणतीही वस्तू/ साधनसामुग्री लाभार्थ्यांना द्यावयाची असल्यास अनुसरावयाच्या कार्यपद्धतीबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयासोबत शासनाच्या विविध विभागामार्फत लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या साधनसामुग्रीची यादी देण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये गृहपयोगी वस्तूपैकी स्वयंपाकाचा गॅस व सौर कुकर (अनु क्र. १२) चा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, गृहपयोगी वस्तूपैकी ताट, प्लेट, वाटया, ग्लास, चमचे, पातेले, मोठे चमचे, पाण्याचा जग, पाण्याची बादली, स्टीलची टाकी, मसाला डबा इत्यादी गृहपयोगी वस्तूंचा समावेश करण्यात आलेला नाही.

मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तूंचा संच देताना खालील बाबींचा समावेश करावा असे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | तपशील | अंदाजित किंमत (रू.) |
|---|---|---|
| १. | डिनर सेट (०६ ताट, ०६ प्लेट, १२ वाटया, ०६ ग्लास, ०६ चमचे) | २०००/- |
| २. | पातेले, मोठे चमचे | ५००/- |
| ३. | पाण्याचा जग (१.५ लीटर) | ४००/- |
| ४. | पाण्याची बादली | ५००/- |
| ५. | स्टीलची टाकी - मोठी | १२००/- |
| ६. | मसाला डबा | ४५०/- |
| | **एकूण** | **५०५०/-** |

माहे मार्च २०१९ अखेर मंडळाकडे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची संख्या ९.२७ लक्ष एवढी आहे. तसेच, दि.१५.०६.२०१९ ते दि.१५.०८.२०१९ या कालावधीत २१ बांधकाम कामांवरील कामगारांच्या नोंदणीचे विशेष नोंदणी अभियान राबवून ५,००,००० बांधकाम कामगांची नोंदणी करणे प्रस्तावित आहे. उपरोक्त गृहपयोगी संचाची अंदाजित किंमत रू.५०५०/- एवढी असून मंडळाच्या मान्यतेअंती सदर वस्तूचे दरपत्रके प्राप्त करून त्याआधारे अंदाजपत्रकीय रक्कम ठरवून त्यानुसार प्रारूप RFP तयार करण्यात येईल. सदर प्रारूप RFP ला शासन मान्यता प्राप्त करून त्यानुसार संच पुरवठयाकरीता ई-निविदा पध्दतीने संस्थेची नियुक्ती व दर निश्चिती करणे प्रस्तावित आहे. सदर संच खरेदीवरील खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीतून भागविणे प्रस्तावित आहे.

मंडळाकडे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार व प्रस्तावित ०५ लक्ष नोंदणीपैकी किती बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तूंचा संच द्यावयाचा आहे. तसेच, गृहपयोगी वस्तूसंचामध्ये करावयाच्या वस्तूबाबत मंडळाच्या निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर चर्चेत सहभागी होताना मंडळ सदस्य श्रीम. आगटे यांनी मुद्या उपस्थित केला की, गृहपयोगी संचातील वस्तूंचे अंदाजित दर जास्त आहेत. याबाबत, खुलासा करताना मंडळ सचिवांनी सादर केले की, सदर गृहपयोगी वस्तूंचे संचाची अंदाजपत्रकीय किंमत ठरवताना बाजारातील विविध संस्थांकडून दर प्राप्त करून अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे व सदर अंदाजपत्रकाच्या आधारे ई-निविदा पध्दतीने दर व पुरवठादार संस्था निश्चित करावी लागणार आहे. सद्यस्थितीत प्रस्तावित गृहपयोगी वस्तूमध्ये काही बदल करणे आवश्यक आहे याबाबत विचार विनिमय करून संचातील वस्तू निश्चित करणे प्रस्तावित आहे.

मा. अध्यक्ष यांनी मत व्यक्त केले की ,बांधकाम कामगार हा सतत स्थलांतरीत होत असल्याने स्थलांतरीत झालेल्या ठिकाणी पुरेशी जागा, स्वंयपाकासाठी, जेवणासाठी व वापरासाठी लागणारी भांडी उपलब्ध नसल्याने बांधकाम कामगाराला कुटूंबासोबत रस्त्याच्या कडेला/ ठेकेदाराने दिलेल्या अडचणीच्या ठिकाणी तात्पुरता निवारा उभारून स्वयंपाक व जेवणाची, झोपण्याची व्यवस्था करावी लागते. पुरेश्या भांडयाअभावी जेवण तयार करणे शक्य होत नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी बांधकाम कामगार व त्याचे कुटूंबिय स्वस्त दरात मिळणाऱ्या हॉटेलमध्ये व अन्य ठिकाणी जेवण करतात. अश्या स्वस्त दरात मिळणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या जेवणामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. तसेच, पुरेश्या झोपेअभावी त्यांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे

स्वयंपाकासाठी, जेवणासाठी व वापरासाठी आवश्यक भांडयाचा संच देणे योग्य राहील असे प्रस्तावित संचामध्ये कढई, परात, झारा यांचाही समावेश करण्यात यावा.

याविषयी, मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांनी सुचित केले की, मंत्री कार्यालयात प्राप्त दोन प्रस्तावांपैकी अध्यक्षांनी सूचविल्याप्रमाणे भांडयाचा संचाशिवाय स्थलांतरीत ठिकाणी वापरण्यासाठी गृहपयोगी वस्तूंचा संच ज्यामध्ये ब्लॅकेट, सतरंजी, चादर, टॉवेल्स, उशीचे कव्हर, बेडशीट इत्यादी वस्तूंचा संच देणे योग्य राहील असे मत व्यक्त केले. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव ५१(५)/२०१९ :- नोंदित बांधकाम कामगारांना भांडयाचा संच ज्यामध्ये ताट (०६), प्लेट (०६), वाटया (१२), ग्लास (०६), लहान चमचे (०६), पातेले कव्हरसह (०६), मोठे चमचे (०३), पाण्याचा जग-१.५ लिटर (०१), पाण्याची बादली- १५ लिटर (०१), स्टीलची टाकी मोठी (०१), मसाला डबा- १६ भाग असलेला (०१), कढई (०१), परात (०१), झारा (०१) यांचा समावेश असेल या वाटपास व त्यावरील प्रती संच रू. ७०००/- एवढया खर्चास मान्यता देण्यात येत आहे. याशिवाय बांधकाम कामगारांच्या वापराकरीता ब्लॅकेट (०२), सतरंजी (०४), चादर (०४), टॉवेल्स (०४), उशीचे कव्हर (०८), बेडशीट (०४) इत्यादी गृहपयोगी वस्तूंचा समावेश असलेला स्वतंत्र संच वाटपास व त्यावरील प्रती संच अंदाजित खर्च रु. ६५००/- एवढया खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर दोन संचाचे दर व पुरवठादार संस्था निश्चितीकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. मे. केपीएमजी या ई-गव्हर्नन्स सल्लागार संस्थेकडून ई-निविदेकरीता आवश्यक निविदा प्रारूप तयार करण्यात यावे. सदर दोन संच वाटपाच्या योजना मंजूरीचा व ई-निविदा प्रक्रियेसाठी तयार केलेले निविदा प्रारूप मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ६: मंडळाकडील नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी प्रसार प्रसिधदीच्या वार्षिक आराख्याडयास मान्यता देणे**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, केंद्र शासनाने योजनांचा प्रसार प्रसिध्दी करण्याकरीता इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) १९९६ अधिनियमातील कलम ६० नुसार वेळोवेळी निर्देश दिलेले आहे.

केंद्र शासनाच्या दि.२३.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहे.

"It has been observed by the Hon'ble Supreme Court in W.P. (Civil) No.318 of 2006 that the expenditure incurred by some of the state Governments/ Union Territories is on advertisements and the Hon'ble Court directed that the amounts so spent should be returned to the accounts of BOCW Cess fund. State welfare Boards constituted under section 18 of the BOCW (RECS) Act, 1996 shall ensure that the Cess money collected under section 3 of the BOCW welfare Cess Act,1996 is utilized only for the pupose(s) specified under section 22 of the BOCW Act,1996. In case any amount of Cess fund collected under BOCW welfare Cess Act ,1996 has been utilized for any purpose other than mandated under Section 22 of the BOCW (RECS)Act, 1996, it shall be the resposiblity of the State Government/UT Administration concerned to recoup such amount into the cess fund on immediate basis and furnish compliance report to this Ministry. This is in addition to the directions given in para 5 of the Order u/s 60 of BOCW Act, dated 09.09.2015 cited above."

तथापि, केंद्रशासनाच्या दि.०८.१०.२०१५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.०३ अन्वये जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

"The Board shall be competent to spend money on publicity and awareness generation through press and media under section २२ (h) of the Act. However, expenditure on such campaigns or activities shall be justified to the extent it focuses on BOC workers only."

देशपातळीवरील National Sample Survey office (NSSO) एनएसएसओ या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात २०१५-२०१६ अखेर सुमारे २७.५३ लक्ष बांधकाम कामगार असून माहे मार्च २०१९ पर्यंत १६.१० लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असून ९.२७ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत आहे. माहे मार्च २०१९ पर्यंत मंडळाच्या विविध

योजनांचा लाभ १२.५३ लक्ष बांधकाम कामगारांना देण्यात आला आहे. मंडळाकडे माहे २२ मे २०१९ पर्यंत जमा उपकर रक्कम रू.७४१५ कोटी च्या तुलनेत योजनांवरील खर्च अत्यल्प आहे. मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणेबाबत मा. सर्वोच्च् न्यायालय, केंद्र शासन व राज्य शासनामार्फत वारंवार निर्देश देण्यात येत आहे. विधानमंडळाच्या अधिवेशनातही विविध आयुधाद्वारे विचारणा करण्यात आलेल्या मुद्यांमध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणे व लाभ वाटप करणेबाबत विचारणा करण्यात येत आहे. बांधकाम कामगारांच्या नोंदणीमध्ये वाढ करण्यासाठी व मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ बांधकाम कामागारापर्यंत पोहचविण्यासाठी जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीच्या विविध माध्यमांचा वापर करून बांधकाम कामागरांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे.

मंडळाच्या बैठकीत पारित ठराव व शासन मान्यतेनुसार मागील ०५ ते ०६ महिन्यात नोंदीत बांधकाम कामगारांकरीता अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी/ग्रामीण) अटल आहार योजना, प्रधानमंत्री श्रमयोगी योजना कार्यन्वित करण्यात अलेली आहे. सदर योजनांचा प्रसार व प्रसिध्दी आवश्यक आहे.

मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीकरीता आर्थिक वर्ष २०१८-१९ करीता बाबनिहाय रू. २५.०६ कोटीचा वार्षिक आराखडा तयार करण्यात आला होता सदर आराखडयास मंडळाच्या दिनांक ०३.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर आराखडयापैकी रू.१५.३३ कोटी एवढा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

मंडळाकडील नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची प्रसार प्रसिध्दी व जनजागृती करण्यासाठी पुढील आर्थिक वर्ष २०१९-२०२० करीता खालीलप्रमाणे वार्षिक आराखडा मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

**Annual Plan For Publicity and Awareness of MBOCWW Board welfare schemes**

| Sr No. | Meadia | Total Exposures | Amount In crore |
|---|---|---|---|
| 1. | Hoarding on BEST Panels | As per DAVP rate | 3.50 |
| 2. | Hoarding on MSRTC Panels | As per DAVP rate | 5.00 |
| 3. | MSRTC announcements at Bus Stands | As per rate applicable | 2.50 |
| 4. | Documentary Production | 1 Film of 5 minutes as per DGIPR RATE | 0.10 |

| | | | |
|---|---|---|---|
| 5. | Radio Spot & Jingle Production | 16 Radio spots of 60 seconds-Category B DGIPR rate | 0.16 |
| 6. | Mobile LED Van for Promotion | Mobile Van | 4.50 |
| 7. | Print | 1540 ads/QP-Releases as per DGIPR Rates | 1.25 |
| 8. | TV Media | 1625 Spots/30 Sec.-Releases as per DAVP rates | 1.00 |
| 9. | Social Media | As per requirement | 0.50 |
| 10. | Radio | 32550 Spots/30 Sec. as per DAVP rates | 0.50 |
| 11. | MSRTC Hoardings | 1150 sites as per approved rates | 1.00 |
| 12. | TV Creative Production | 8 TVC of 60 seconds as per Category B DGIPR rate | 0.60 |
| 13. | Creative adaptations & Booklet Designing | As per requirement | 0.10 |
| 14. | Benefit Distribution Programe | 12 Melava | 4.00 |
| | | **Total Budgeted Cost** | **24.71** |

मा. मुख्यमंत्री महोदय यांचे मा. प्रधान सचिव यांच्या दि.२४.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये महामंडळ अथवा उपक्रमाद्वारे दिल्या जाणाऱ्या संदेशासाठी वितरीत दूरचित्रवाणी आणि बाहय स्त्रोताद्वारे आखण्यात येणाऱ्या जनसंवाद मोहीमेसाठीचा एक आराखडा मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अवलोकनार्थ दि.०४.०६.२०१९ पर्यंत सादर करण्यात यावा. ज्या योगे या मोहीमेची सुरूवात लवकरात लवकर करता येईल अशा लेखी सूचना प्राप्त झालेल्या आहेत. प्रत सोबत संलग्न. मंडळास सादर उपरोक्त प्रारूप आराखडयात मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या कार्यालयाकडून बदल सुचविल्यानंतर त्यानुसार सुधारित आराखडा तयार करून प्रसार प्रसिध्दीची कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

सन २०१९-२०२० करीता प्रस्तावित रु. २४.७१ कोटीच्या प्रसार प्रसिध्दीच्या आराखड्यास मंडळाची मंजुरी प्रदान करण्यातबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर विषयावर चर्चेत सहभागी होताना मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सूचित केले की, अन्य माध्यमांद्वारे प्रसिध्दीकरीता रू. ५.२९ कोटीची तरतूद आराखडयात समाविष्ट करून एकूण रू. ३०.०० कोटीचा आराखडा तयार करण्यात यावा व मा. मुख्यमंत्री कार्यालयाच्या

निर्देशानुसार सदर आराखडा सहमती करीता मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या कार्यालयास सादर करावा. मा. मुख्यमंत्री महोदय कार्यालयाकडून प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीकरीता मंजूर आराखडयानुसार माहिती व जनसंपर्क विभागाच्या पॅनेलवरील संस्था अथवा सोल एजन्सी मार्फत पुढील कार्यवाही करण्यात यावी. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५१(६)२०१९: मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना व बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ करण्यासाठी सन २०१९-२० करीता करावयाच्या प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीकरीता रू. ३०.०० कोटीच्या वार्षिक आराखडयास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीचा आराखडयात मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या कार्यालयाकडुन सूचित करण्यात आलेले बदल समाविष्ट करून अंतिम आराखडयातील माध्यमनिहाय प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीची कार्यवाही माहिती व जनसंपर्क विभागाच्या पॅनेलवरील संस्था अथवा सदर माध्यमांसाठी नियुक्त सोल एजन्सी मार्फत करण्यात यावी. त्यानुसार प्रस्ताव शासन मान्यसतेस सादर करण्यात यावा, शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०७ :- मंडळाच्या मुख्यालयाकरिता एमएमटीसी लि, भारत सरकारचा उपक्रम, बीकेसी बान्द्रा (पूर्व) येथील जागा भाडेतत्वावर घेण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, यांचेकडील पत्र क्र.इबांका-२०१७/प्र.क्र.४२२/काम-७, दि.०७.०२.२०१८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ आणि असंघटीत कामगार मंडळ या दोन्ही मंडळामार्फत बांधकाम कामगार व असंघटीत कामगारांची नोंदणी करून त्यांना कल्याणकारी योजनाचा लाभ देण्यासाठी सुविधा केंद्र स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्या दालनात दि. ०७.०४.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मंडळाकरीता प्रस्तावित मुख्यालय, ६ प्रादेशिक कार्यालये व ३५ जिल्हा कार्यालयाकरिता आवश्यक जागा मंडळामार्फत उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

मंडळाच्या मुख्यालयाकरीता सुमारे ४०००-८००० चौ.फुट जागा भाडेतत्वावर घेण्यासाठी वृत्तपत्रांतून दिनांक ०५.०३.२०१९/ दिनांक २५.०३.२०१९ रोजी जाहिरात प्रसिध्द करून बंद लिफाफ्यातून देकार मागविण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने आतापर्यंत ६ देकार प्राप्त झाले आहेत. सदरहू बंद लिफाफे उघडण्याचा दिनांक १०.०६.२०१९ असा आहे.

दरम्यानच्या कालावधीत कामगार भवनाच्या लगत असलेल्या मे.एमएमटीसी लि, भारत सरकारचा उपक्रम, बीकेसी बान्द्रा (पूर्व) यांच्या इमारतीतील पाचव्या माळयावरील सुमारे ४४४८ चौ.फुट जागा भाडेतत्वावर देण्यासाठी उपलब्ध असल्याचे कळून आले. याच इमारतीमध्ये ४ थ्या माळयावरील आणि ६,७ व ८ व्या माळयावरील जागा अनुक्रमे नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या केंद्र शासनाच्या अधिनस्त कार्यरत संस्थाना देण्यात येत असल्याचेही समजले. प्रस्तावित जागा सध्याच्या कामगार भवनातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालयापासून पाच मिनिटांच्या अंतरावर आहे.

मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, सौ. वेदा आगटे, सदस्या, श्री. अशोक भुताड, सदस्य आणि सचिव तथा मु.का.अ, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी दि. २२.०५.२०१९ रोजी सदरहू जागेची पाहणी देखील केलेली आहे. पहाणी दरम्यान सदरहू जागा योग्य असल्याचे सकृतदर्शनी आढळून आल्याने मे. एमएमटीसी लि. या संस्थेच्या बीकेसी कार्यालयातील General Manager व Assistant General

Manager यांना दि. २४.०५.२०१९ रोजी मंडळ मुख्यालयात पुढील सविस्तर चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. सदरहू चर्चेच्या अनुषंगाने एमएमटीसी लि. मुंबई कार्यालयातून त्यांच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयात प्रस्तावित जागेचे भाडे व अन्यबाबी अंतिम करण्यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. मे.एमएमटीसी लि मुंबई, कार्यालयाने त्यांच्या बीकेसी येथील इमारतीतील पाचव्या माळयावरील सुमारे ४४४८ चौ.फुट जागा भाडेतत्वावर देण्याचा सविस्तर प्रस्ताव दि. २९.०५.२०१९ रोजीच्या ईमेलद्वारे मंडळास पाठविलेला आहे. तो प्रस्ताव पुढील प्रमाणे आहे-

| अनु क्र. | बाब | तपशील | अंदाजित मासिक खर्च (रुपयात) |
|---|---|---|---|
| १. | जागेचा पत्ता | ५ वा माळा, एमएमटीसी इमारत, बीकेसी बांन्द्रा (पू) | |
| २. | जागेचे क्षेत्रफळ | ४४४८ चौ.फुट- कारपेट<br>५२८३ चौ.फुट- बिल्टअप | |
| ३. | जागेचे दर महा भाडे | रुपये २८१.५० प्रति चौ.फुट याप्रमाणे ४४४८ चौ.फुट कारपेट एरिया करीता | १२,५२,११२/- |
| ४. | एसी प्लांट/ ईलेक्ट्रीक मेंटेनन्स | एकूण खर्चाच्या समभागात (फ्लोअर वाईज) | १०,०००/- |
| ५. | सुरक्षा रक्षक खर्च | एमएमटीसी कडून सुरक्षा रक्षक पुरविल्यास प्रति सुरक्षा रक्षक प्रति माह खर्च | २२,०००/- |
| ६. | हाऊसकिपींग | एमएमटीसी कडून सफाई कामगार पुरविल्यास प्रति सफाई कामगार प्रति माह खर्च | २२,०००/- |
| ७. | विद्युतशुल्क | मजला निहाय, एसी प्लांट, लिफ्ट व समाईक जागा (Common Area) यासाठी स्वतंत्र सब-मीटर्स आहेत त्यानुसार दरमहा आकार लावण्यात येईल. | २५,०००/- |
| ८. | वस्तू व सेवाकर | @१८% दराने | २,२५,३८०/- |
| | | एकूण | १५,५६,४९२/- |

अ. अपेक्षित अनुषंगिक खर्च :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सुरक्षा अनामत रक्कम | - | रू.७५,१२,६७२/- (०६ महिन्यांचे आगाऊ भाडे) |
| २. | लिव्ह अँड लायसन्स करारनामा नोंदणी | - | प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% |
| ३. | भाडेवाढ | - | ३३ महिन्यानंतर १५% मासिक भाडेवाढ |

ब. एमएमटीसीने मोफत देऊ केलेल्या सुविधा :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मालमत्ता कर | - | एमएमटीसी भरणार |
| २. | पाणीपटटी | - | एमएमटीसी भरणार |
| ३. | वाहनतळ व्यवस्था | - | ०५- चारचाकी व ०५ दुचाकी वाहने |
| ४. | उद्वावाहन व्यवस्था | - | एकूण ०४ |
| ५. | आग प्रतिबंधक यंत्रणेची देखभाल दुरूस्ती | - | एमएमटीसी करणार |

६. स्ट्रक्चरल बदल न करता एमएमटीसीच्या पूर्व परवानगीने फर्निचर, पेन्टिंग, केबीन बांधणी इ.कामे करता येतील. यासाठी ४५ दिवसांचा भाडेरहित कालावधी देण्यात येईल.

मंडळाच्या मुख्यालयाकरीता मे. एमएमटीसी लि. यांचेकडून भाडेतत्वावर घ्यावयाच्या जागेचा खालीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.

१. मे.एमएमटीसी लि. यांच्या बीकेसी येथील इमारतीतील ५ व्या माळयावरील सुमारे ४४४८. चौ.फुट जागा भाडेतत्वावर ५ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यास मान्यता मिळावी.

२. भाडेतत्वावर घ्यावयाच्या ४४४८ चौ. फुट जागेचे प्रतिमाह रू. १५,५६,४९२/- एवढया खर्चास मान्यता मिळावी.

३. उपरोक्त 'अ' येथे नमूद अनुषंगिक खर्चास मान्यता मिळावी.

४. मंडळाच्या मुख्यालयासाठी ४००० ते ८००० चौ.फूट जागा भाडयाने घेण्याकरीता मागविण्यात आलेली निविदा सूचना रदद करण्यास मान्यता मिळावी.

५. मंडळास अतिरिक्त जागेची आवश्यकता भासल्यास व मे. एमएमटीसी ने त्याच इमारतीत जागा उपलब्ध करून दिल्यास प्रति चौ. फुट प्रति माह रू. २८१.५० या मंजूर दराने व त्याच अटी शर्तीनुसार अतिरिक्त जागा घेण्यास मान्यता मिळावी.

उपरोक्त प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर. मंडळाच्या मान्यतेअंती शासनाच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव क्र. ५१(७)/२०१९ :- मंडळाच्या मुख्यालयासाठी, मे.एमएमटीसी लि. यांच्या बीकेसी येथील इमारतीतील ५ व्या माळयावरील सुमारे ४४४८ चौ.फुट जागा ५ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यात यावी. भाडेतत्वावर घ्यावयाच्या सुमारे ४४४८ चौरस फुट जागेचे प्रतिमाह रूपये १५,५६,४९२/- एवढे भाडे (अनुषंगिक खर्च व वस्तू सेवा करासह) एमएमटीसीस अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरहू जागा भाडयाने घेण्यासाठी आवश्यक सुरक्षा अनामत रक्कम- रू.७५,१२,६७२/- लिव्ह अँड लायसन्स करारनामा नोंदणी खर्च (प्रत्यक्ष खर्चाच्या ५०%) या अनुषंगिक खर्चास तसेच ३३ महिन्यांनंतर १५% मासिक भाडेवाढ अदायगीस मान्यता देण्यात येत आहे.**

**मंडळाच्या मुख्यालयासाठी ४००० ते ८००० चौ.फूट जागा भाडयाने घेण्याकरीता मागविण्यात आलेली निविदा सूचना रदद करण्यात यावी. तसेच मंडळास भविष्यात अतिरिक्त जागेची आवश्यकता भासल्यास व मे. एमएमटीसी ने त्याच इमारतीत उपरोक्त मंजूर दराने व मंजूर अटी शर्तीनुसार जागा उपलब्ध करून दिल्यास अतिरिक्त जागा भाडयाने घेण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**यानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेअंती पूढील कार्यवाही करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०८ :- मुख्यालय, विभागीय कार्यालय व जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरिता संस्था निश्चितीस व दरस्वीकृतीस तसेच, फर्निचर पुरवठा व इस्टॉलेशनच्या तपासणीकरीता वास्तूविशारदाच्या नेमणुकीस मान्यता देण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी मंडळाचे कामकाज व गरजा हाताळण्यासाठी मंडळात स्वत:चे आस्थापनेवर पूर्ण वेळ कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अभाव आणि हिशोब व लेख्यांवर अंतर्गत नियंत्रण ठेवण्यासाठी अतिशय अपुरी प्रणाली ही मंडळाच्या प्रशासकीय अक्षमतेची कारणे असल्याचे क्षेत्रिय लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेले आहे. मंडळाने याबाबत प्रभावी उपायोजना करण्यासाठी मंडळाच्या संपूर्ण कामकाजाचा अंतर्भाव असणारे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यासाठी मंडळाच्या दि. ३०.०७.२०१४, दि.१६.०८.२०१५, दि.०१.१०.२०१५ बैठकीतील ठरावान्वये जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. दि.०६.०६.२०१७ च्या ठरावान्वये ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चितीसाठी RFP च्या अटी शर्तीस मान्यता प्रदान करण्यात आली होती व दि. २१.०३.२०१८ च्या बैठकीतील ठरावान्वये निविदापूर्व बैठकीमध्ये इच्छुक निविदाकारांना उपस्थित केलेल्या मुद्यांस अनुसरून सुधारित RFP ला मान्यता प्रदान केली होती.

मंडळ स्तरावरून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास व RFP ला शासनाच्या दि.०७.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती.

शासनमान्यतेनुसार मंडळस्तरावरून जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चितीसाठी दि.२७.०२.२०१८ रोजीच्या निविदा सूचनेद्वारे नोंदणीकृत अनुभवी व नामांकित पुरवठादारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा सूचनेच्या प्रतिसादामध्ये ०४ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी ०२ निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्या. तथापि, सदर पात्र निविदाकारांना निविदेसोबत सादर पुरवठयाच्या अनुभवाबाबत पुरवठा आदेश देण्याऱ्या संस्थांकडून यशस्वी पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत खरेदी समितीच्या दि.२७.०८.२०१८ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार कळविण्यात आले. तथापि, वारंवार संधी देऊनही यशस्वी पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित निविदाकारांना सादर केले नाही. परिणामी, खरेदी समितीच्या दि.२०.१०.२०१८ रोजीच्या बैठकीत याबाबत विचारविनिमय करून सदर दोन निविदाकारानांही अपात्र ठरविण्यात आले व फेरनिविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

खरेदी समितीच्या उपरोक्त निर्णयानुसार मंडळाच्या दि.१२.११.२०१८ रोजीच्या निविदा सूचनेद्वारे दुसऱ्यांदा ई- निविदा मागविण्यात आल्या. सदर निविदा सूचनेच्या प्रतिसादात

०३ निविदाकारांनी निविदा सादर केल्या. सदर निविदा खरेदी समितीसमोर उघडण्यात आल्या. सदर दिवशी निविदाधारकांना निविदेसोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर दस्तऐवजाची हार्ड कॉपी मंडळ कार्यालयात सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. परंतु मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएटस यांनी तांत्रिक लिफाफ्यासोबतच दराचा व्यापारी लिफाफा मंडळ कार्यालयास सादर केला त्यामुळे निविदेतील अट क्र.४.१७ अन्वये मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएटस यांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे. तसेच, मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. यांनी तांत्रिक बाबींची पूर्तता न केल्याने त्यानाही अपात्र ठरविण्यात आले. तांत्रिक मुल्यांकनानुसार मंडळाकडे सादर ०३ निविदाकारांपैकी पात्र व अपात्र निविदाकार खालीलप्रमाणे होते.

| अ.क्र. | निविदाकार संस्था | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १. | मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएटस | अपात्र |
| २. | मे. टेलेस्टो कॉमनेट प्रा.लि. | पात्र |
| ३. | मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. | अपात्र |

उपरोक्त प्रमाणे केवळ ०१ निविदाकार पात्र ठरत असल्याने उद्योग,उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दिनांक ०१.१२.२०१६ च्या भाग क्र.४.४.३.१ उपकलम (क) नुसार " एकही नाही अथवा एकच निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास पुर्नर्निविदा काढण्यात यावी" असे नमूद केलेले आहे. ही बाब विचारात घेवून सदर अटीच्या अधीन राहून पुर्नर्निविदा काढण्यात यावी. असा निर्णय खरेदी समितीच्या दि.१२.१२.२०१८ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला होता.

खरेदी समितीच्या उपरोक्त निर्णयानुसार दि.१४.०१.२०१९ रोजी तिसऱ्यांदा ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. सदर ई-निविदा सूचनेच्या प्रतिसादामध्ये खालील ०६ निविदाकारांनी निविदा सादर केल्या.

१. मे. चिंतामणी पारस्वनाथ एन्टरप्राईझेस
२. मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स
३. मे.जयंत के फर्निचर
४. मे. कंचन असोसिएट्स
५. मे. अंकीत कॉटेज इंन्डस्ट्रीज
६. मे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित.

सदर निविदा दि.०७.०२.२०१९ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीत उघडण्यात आल्या व छाननीकरिता मे. के.पी.एम.जी. यांच्याकडे सुपुर्द करण्यात आल्या होत्या त्यानुसार मे. के.पी.एम.जी. यांनी सादर केलेल्या छाननी तपशीलावर दि.०२.०३.२०१९ रोजीच्या खरेदी

समितीच्या बैठकीत छाननी करण्यात आली. समितीच्या छाननीनुसार प्राप्त ०६ निविदाकारांपैकी तांत्रिकदृष्टया पात्र व अपात्र निविदाकार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकार संस्था | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १ | मे. चिंतामणी पारस्वनाथ एन्टरप्राईझेस | पात्र |
| २ | मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स | पात्र |
| ३ | मे. जयंत के फर्निचर | पात्र |
| ४ | मे. कंचन असोसिएट्स | अपात्र |
| ५ | मे. अंकीत कॉटेज इंन्डस्ट्रीज | अपात्र |
| ६. | मे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित. | अपात्र |

खरेदी समितीच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत उपरोक्त ०३ पात्र निविदाकारांकडून निविदेतील अट क्र.५.५ नुसार सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी वापरण्यात येणार फर्निचरचे नमुने प्राप्त करून प्रयोगशाळा तपासणीस पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मंडळाच्या दि.०५.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मे. सुपरिटेंडंस कंपनी ऑफ इंडिया (प्रा.) लि या प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले. सदर प्रयोगशाळतून दि.०७.०३.२०१९ रोजी बंद लिफाफ्यात तपासणी अहवाल मंडळास प्राप्त झाला.

खरेदी समितीच्या दि.०८.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत मे. सुपरिटेंडंस कंपनी ऑफ इंडिया (प्रा.) लि यांचेकडून बंद लिफाफ्यात प्राप्त तपासणी अहवाल खरेदी समिती समक्ष उघडण्यात आला. सदर अहवालानुसार पात्र ०३ निविदाकारांना सादर केलेले सर्व नमुने निविदा अटी शर्तीची पूर्तता करत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले होते. सदर अहवालानुसार तीनही पात्र निविदाकरांचे दरपत्रक उघडण्याचा निर्णय समितीने एकमताने घेतला व दरपत्रके उघडण्यात आली. पात्र ०३ निविदाकारांकडून प्राप्त दराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्राप्त निविदाकाराचे नाव | सादर केलेले एकूण दर (रू.) वस्तू व सेवा करांसह | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स | २४,८४,९१,८८८.२८/- | L-१ |
| २. | मे. चिंतामणी पारस्वनाथ एन्टरप्राईझेस | २६,९०,९१,६२०.००/- | L-२ |
| ३. | मे.जयंत के फर्निचर | २७,८१,८६,८९५.००/- | L-३ |

खरेदी समितीच्या दि.०८.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत मंडळांतर्गत मुख्यालय, विभागीय कार्यालय व जिल्हा स्तरावर कामगार सुविधा केंद्र (WFC) स्थापन करण्यासाठी

मागविण्यात आलेल्या ई-निविदेच्या प्रतिसादात प्राप्त ०६ निविदांपैकी पात्र ०३ निविदाकारांनी सादर केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता विचारात घेता मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स यांनी सादर केलेले रू. २४,८४,९१,८८८.२८/- (वस्तू व सेवा करांसह) दर न्यूनतम (L१) असल्याने व सदर दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी असल्याने स्विकृत करून शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्याची शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला.

खरेदी समितीच्या उपरोक्त निर्णयानुसार मंडळांतर्गत मुख्यालय, विभागीय कार्यालय व जिल्हा स्तरावर कामगार सुविधा केंद्र (WFC) स्थापन करण्यासाठी राबविण्यात आलेली ई-निविदा प्रक्रिया, तिसऱ्यांदा मागविण्यात आलेल्या ई-निविदेच्या प्रतिसादात प्राप्त ०६ निविदांपैकी पात्र ०३ निविदाकारानी सादर केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता विचारात घेता व खरेदी समितीची उपरोक्त शिफारस विचारात घेता मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स यांनी सादर केलेले दर रू. २४,८४,९१,८८८.२८/- स्विकृतीस व मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.०८.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार लोकसभेची आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर दि.२७.०५.२०१९ रोजी नियुक्त संस्थेसोबत रीतसर करारनामा करण्यात आलेला आहे व दि.२८.०५.२०१९ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

फर्निचर पुरवठा व इस्टॉलेशनच्या तपासणीकरीता वास्तूविशारदाच्या नेमणुकीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पॅनेलवरील रू.०५ कोटी ते २५ किंमतीच्या कामाकरीता नियुक्त वास्तू विशारदांकडून EOI (स्वारस्य अभिव्यक्ती) मागविण्यात आले होते. सदर वास्तूविशारदांना ई-मेलद्वारे EOI चे प्रारूप पाठविण्यात आले होते. तसेच, त्यांच्याशी दूरध्वनीवरूनही संपर्क साधण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पॅनेलवरील संस्थांपैकी ०३ संस्थांनी त्यांचे प्रस्ताव मंडळास सादर केले होते.

मंडळास सादर प्रस्तावाच्या छाननीअंती तीनही संस्था पात्र असल्याचे दिसून आले. पात्र ०३ संस्थांनी सादर केलेल्या दराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | सादर केलेल्या दराची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. अॅकोटेक कन्सल्टंट प्रा.लि. बदलापूर | १.२५% | L-१ |
| २. | मे. देवरे धामणे आर्किटेक्ट, नाशिक | १.३२% | L-२ |
| ३ | मे. किकॉन्स लिमिटेड, पुणे | १.९८% | L-३ |

उपरोक्त तीन संस्थांपैकी मे. अॅकोटेक कन्सल्टंट प्रा.लि. बदलापूर यांचे १.२५% हे दर सर्वात कमी असल्याने सदर दर स्विकृत करून मे. अॅकोटेक कन्सल्टंट प्रा.लि. बदलापूर यांची

मुख्यालय, विभागीय कार्यालय व जिल्हा कामगार सुविधा केंद्रांकरीता वास्तूविशारद म्हणून नियुक्तीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे. सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५१(८)/२०१९ :- मुख्यालय, विभागीय व जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरिता संस्था निश्चिती व दर स्विकृतीकरीता राबविण्यात आलेली ई-निविदा प्रक्रिया, मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स या संस्थेची नियुक्ती व सदर संस्थेने सादर केलेले न्यूनतम दर रू. २४,८४,९१,८८८.२८/- यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच, फर्निचर पुरवठा व इन्स्टॉलेशनच्या तपासणी करीता वास्तूविशारदाच्या नेमणूकी करीता सार्वजनिक विभाग बांधकाम विभागाच्या पॅनलावरील ५ ते २५ कोटी किंमतीच्या कामाकरीता नियुक्त वास्तू विशारदांपैकी नियुक्त मे. ॲकोटेक कन्सल्टंट प्रा.लि बदलापूर यांची मुख्यालय, विभागीय व जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरिता अपेक्षित खर्चाच्या १.२५ टक्के दर स्विकृतीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. ९: अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) व अटल आहार योजनांच्या लाभ वाटपाच्या कार्यक्रमावरील खर्चास मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव कामगार यांच्या उपस्थितीत दि.१५.१२.२०१८ रोजी संपन्न झालेल्या कामगार विभागाच्या आढावा बैठकीत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी राज्यातील विविध ठिकाणी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजानांचे लाभ, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचे कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आलेले होते.

त्यास अनुसरून राज्यातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या लाभ वाटपाच्या कार्यक्रमाचे अयोजन (नियोजन, व्यवस्थापन अंमलबजावणी) करणेकरीता शासन निर्णय क्र. मावज-२०१७/प्र.क्र. २७६/३४ दि. २१.०५.२०१८ अन्वये गट – ड मधील समाविष्ट इव्हेंट ॲन्ड बीटीएल अंतर्गत कार्यक्रमाचे नियोजन करणे आणि अंमलबजावणी करणे यामध्ये सार्वजनिक कार्यक्रम, बैठक, प्रदर्शने, चर्चासत्र परिसंवाद इत्यादी बाबीचा समावेश असलेल्या संस्थाची विभागनिहाय निवड करण्यात आली आहे. पुणे विभाग, औरंगाबाद विभाग, नाशिक विभाग, अमरावती विभाग व नागपूर विभागाकरीता मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि. यां संस्थेची निवड करण्यात आलेली आहे. कोकण विभागाकरीता मे. ओढ हिरवळीची या संस्थेची निवड करण्यात आलेली आहे. याबाबत, मंडळाच्या दि. १८.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. इबांका२०१८/प्र.क्र.२३२/काम-७ दि. २१.१२.२०१८ रोजी शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप व अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) व अटल आहार योजनेचा शुभारंभ करीता आयोजित कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शुभारंभ/ लाभ वाटपाचे ठिकाण | जिल्हा | लाभ वाटप कार्यक्रमाचा दिनांक | लाभ वाटपावरील खर्च (G.S.T. वगळून) |
|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा स्टेडीयम, चंद्रपूर | चंद्रपूर | २४.१२.२०१८ | ३७,४१,७०० |
| २. | खांदेश्वर नवीन, पनेवल | रायगड | १०.०१.२०१९ | ३०,९०,७५५ |
| ३. | कृषी उत्पन्न बाजार समिती, भोकरदन | जालना | १०.०२.२०१९ | ४९,६५,८०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | लाल बहादूर शास्त्री दशहेरा मैदान | भंडारा | २२.०२.२०१९ | ४९,९८,०६६ |
| ५. | एस.टी. डेपो मैदान औसा, | लातूर | २६.०२.२०१९ | ४९,१६,३३२ |
| ६. | नगर पंचायत शेजारी शिरूर अनंतपाळ | लातूर | २६.०२.२०१९ | ४९,९४,५०७ |
| ७. | सुपर मार्केट मैदान, देवणी | लातूर | २७.०२.२०१९ | ४९,४९,६८८ |
| ८. | शिवाजी विदयालय मैदान, निलंगा | लातूर | २७.०२.२०१९ | ६५,३२,७३२ |
| ९. | लक्ष्मी नाराण मंगलवेढा, कार्यालय | सोलापूर | ०५.०३.२०१९ | २०,०६,७९० |
| १०. | हुतात्मा स्मृती मंदीर, सोलापूर | सोलापूर | ०५.०३.२०१९ | ८,१९,९५२ |
| ११. | ॲग्रीकल्चर ग्राउंड | पुणे | १९.०२.२०१९ | ९५,१९,१७६ |
| १२. | कस्तुरचंद पार्क मैदान | नागपूर | ०७.०३.२०१९ | ९६,३६,५३८ |
| | | | **एकुण खर्च रू. (वस्तू सेवा कर वगळून)** | **६,०१,७२,०३६** |

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.मावज-२०१७/प्र.क्र.३७६/३४ दि. २१.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रसार माध्यम क्षेत्रातील विशिष्ट अनुभव व व्यवसायिक अहर्ता प्राप्त परंतु ५० लाखापेक्षा कमी आर्थिक उलाढाल असलेल्या संस्थांची निवड करणेबाबत निर्देश आहेत. त्यानुसार अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप कार्यक्रमापैकी ०९ कार्यक्रमावरील खर्च वस्तू सेवा कर वगळता रू.५० लक्ष मर्यादेपेक्षा कमी असल्याने सदर खर्चाची अदायगी मंडळ स्तरावरून करण्यात आलेली आहे. तथापि, मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) चा शुभारंभ ॲग्रीकल्चर ग्राउंड, पुणे येथे व अटल आहार योजनेचा शुभारंभ कस्तुरचंद पार्क मैदान नागपूर येथील कार्यक्रमाला १५ ते २० हजार बांधकाम कामगार उपस्थित होते याशिवाय संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री महोदय, कामगार मंत्री महोदय, लोकसभा सदस्य, विधानसभा सदस्य, वरिष्ठ अधिकारी/ कर्मचारी उपस्थित असल्याने सदर कार्यक्रमाचा खर्च रू. ५० लक्ष पेक्षा जास्त झालेला आहे. याशिवाय शिवाजी विद्यालय मैदान,

निलंगा येथे आयोजित विविध कल्याणकारी योजनांचे  लाभ वाटप कार्यक्रमासही १५ हजारांपेक्षा जास्त बांधकाम कामगार, मा. मंत्री महोदय वरिष्ठ अधिकारी/ कर्मचारी उपस्थित असल्याने याही कार्यक्रमाचा खर्च रू.५० लक्ष पेक्षा जास्त झालेला आहे. सदर खर्च मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेअंती प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात येईल व शासन मान्यतेअंती देयकाची अदायगी करणे प्रस्तावित आहे. सदर विषयाबाबत सविस्त्र चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५१(९)२०१९: मंडळामार्फत अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप व अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) व अटल आहार योजनेच्या शुभारंभा करीता आयोजित १२ कार्यक्रमावरील रु. ६,०१,७२,०३६/- (वस्तू व सेवाकर वगळून) एवढया खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.  नागपूर, पूणे व निलंगा (लातूर) येथील  तीन कार्यक्रमावरील खर्च रु. ५० लाखापेक्षा जास्त आहे. सदर खर्च मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यसतेस सादर करण्यात यावा, शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

## विषय क्र. १०: मंडळाकडील अतिरिक्त निधीची गुंतवणुक करतांना अनुसरावयाच्या सुधारित कार्यपध्दतीबाबत निर्णय घेणे

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अतिरिक्त निधीची मुदत ठेवीमध्ये गुंतवणुक करण्यासाठी मंडळाच्या दि. २२.०५.२०१९ रोजीच्या मंडळ बैठकीमध्ये खालील प्रमाणे उपसमिती गठित करण्यात आलेली आहे.

**मंडळाचा जमा निधी गुंतवणुक उपसमिती**

| अ.क्र. | गुंतवणुक उप समिती अध्यक्ष/सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. | मा. अध्यक्ष |
| २. | मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | मा. सदस्य |
| ३. | श्रीमती. वेदा आगटे | मा. सदस्य |
| ४. | श्री. अशोक भुताड | मा. सदस्य |
| ५. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकरी | मा. सदस्य-सचिव |

त्यानुसार शासन वित्त विभागाच्या दिनांक **२७.१०.२०१५** च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार मुदत ठेव गुंतवणुक करण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी राष्ट्रीयकृत बँकांच्या विभागीय कार्यालयास व्याजदरासह ई-मेलव्दारे व दुरध्वनीवरून कळविण्यात येते त्याअनुषंगाने विभागीय कार्यालयाने प्राधिकृत केलेले संबंधित शाखेचे प्रतिनिधी मुदत ठेव बैठकीस हजर राहतात सदर बैठकीमध्ये उच्चतम व्याजदर प्राप्त् राष्ट्रीयकृत बँकेमध्ये रू.१००० कोटीच्या मर्यादेत मंडळाच्या अतिरिक्त निधीची १ वर्षासाठी उपसमितीचे मा. अध्यक्ष व सदस्यांच्या संमतीने मुदत ठेव गुंतवणुक करण्यात येते.

राष्ट्रीयकृत बँकांच्या विभागीय कार्यालयांना पाठविण्यात येत असलेल्या सदर मुदत ठेव गंतवणुकीच्या व्याजदराबाबतच्या गोपनिय पत्रामध्ये खालील अटी व शर्तीचा उल्लेख केला जातो.

1. No Fax or email will be entertained. Offer submitted in person during the investment meeting on original letter head will only be considered valid.

2. Letter from the Head/Zonal/Regional office stating the

A) The branch name which has been authorized for receiving the funds from The Maharashtra Building and Other Construction Workers' Welfare Board, Mumbai

B) Details of bank representative authorized by the bank.

C) R.T.G.S. details of the bank.

3. Authorized Bank representative to carry original identity card and submit a copy of the same to this office.

4. In case equal rate of interest is quoted by more than one banks, the Maharashtra Building and Other Construction Workers' Welfare Board, Mumbai will be the final authority to decide on the allotment of funds.

5. Commission charges towards R.T.G.S. payment, in any case, will have to be borne by the bank to which funds are allotted.

6. In case of Bank refusal or rejection of the funds after the final allotment, the loss of interest on the funds shall be recovered from the concerned bank, as an arrears of land revenue.

7. The Maharashtra Building and Other Construction Workers' Welfare Board, Mumbai reserves all rights to accept or to reject the rate quotations or proposal for investment.

8. The Board may change or modify Investment amount considering rate of interest offered by the bank.

9. It will be the Bank's responsibility to deliver the original FDR to the Board by the authorized officer in person on the same day of investment.

10. It will be the Bank's responsibility to collect the FDR from the Board on the day of maturity.

11. The matured amount of investment has to be transferred to the Board's account by the concerned bank on the date of maturity itself.

12. If the bank fails to transfer the matured amount on the date of investment, for any reasons the bank has to pay interest for the number of delayed days, at the rate of interest on the mature amount

13. Guidelines/instructions in respect of surplus investment mentioned in the Govt. of Maharashtra, Finance Dept., Govt. resolution dated 27.10.2015 will be applicable to this investment in to There shall be no deviation from them.

14. Overdraft or loan or cash credit against the board FDR shall not be given on any account by the Banker. In case of contravention, the sole responsibility will be of the banker.

15. Since Maharashtra Building and Other Construction Workers Welfare Board, is established under a Central Government Act, as per Notification S.O. 3489 { NO.170 (F.NO.12/164/68-ITCC/ITJ).} Dated 22.10.1970 of the Income tax Act, 1961, TDS on interest is not required to be deducted " On the interest payable to Maharashtra Building and Other Construction Workers Welfare Board, Mumbai."

16. The Banker shall submit the balance confirmation of the FD, with the concerned of Head Office/ Zonal Office/ Regional office/officers on 1st day of every month. No Lien/over draft Status, Any Kind of encumbrance on Fixed Deposit will not be allowed.

17. The bank shall issue certificate as on 31.03.2020 mentioning the FD's principal amount, interest earned and accrued for the year 2019-2020

18. The Bank Regional representative should bring a acceptance, stating all the above terms and conditions are accepted.

19. Any type of current / savings account should not be opened in the name of the Board and the amount invested should not be diverted to that account.

20. When the Boards officer / employee visits in your bank, to verify fixed deposit/ investment status in your bank's computer system, should be allowed to confirm the fixed deposit/Investment in your banks computer system.

## मंडळाचा माहे मे २०१९ अखेर गुंतवणुकीचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रू.कोटी) | व्याजदर द.सा.द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वते नंतर मिळणारी रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पंजाब अॅन्ड सिंध बँक, मलबार हिल, मुंबई | ०४२८१४०००५११५७ | ३०.०६.२०१८ | ३०.०६.२०१९ | ६०० | ७.२३ | ६४४.५७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया, विलेपार्ले पश्चिम,मुंबई | ४०८१०३०३०५७९११३२ Recipt No. ८४३६३२ | २८.०८.२०१८ | २८.०८.२०१९ | ८५० | ७.११ | ९१२.०६ |
| ३ | आंध्रा बँक, खार पश्चिम, मुंबई | ११३९२०१०००८४७६२ Recipt No. १५६२२४ | ०६.१०.२०१८ | ०६.१०.२०१९ | १००० | ७.४० | १०७६.०७ |
| ४ | पंजाब नॅशनल बँक,वरळी नाका, मुंबई | ०५६४००UR०००००९१८ Recipt No. ०५६४०० | ०६.१०.२०१८ | ०६.१०.२०१९ | ३९० | ७.४० | ४१९.६७ |
| ५ | इंडियन ओव्हरसीस बँक | १२८०४०००००७९४८ Recipt No. NDRR०८३३३८४ | ११.०१.२०१९ | ११.०१.२०२० | १००० | ७.५१ | १०७७.२४ |
| ६ | कॅनरा बँक, ओव्हरसीस मेन ब्रॅन्च, मुंबई | १५८९४०१००१६११ Recipt No.KK३८४३८३ | २४.०२.२०१९ | २४.०१.२०२० | १००० | ७.६० | १०७८.११ |
| ७ | बँक ऑफ बडोदा, बांद्रा (पुर्व), मुंबई | २९०४०३०००३१३१९ | १६.०४.२०१९ | १६.०४.२०२० | ६५० | ७.४० | ६९९.४५ |
| ८ | पंजाब नॅशनल बँक,वरळी नाका, मुंबई | ०५६४००UR०००००९१८ Recipt No. ०५६४०० | ०८.०५.२०१९ | ०८.०५.२०२० | ६१० | ७.४० | ६५६.७९ |
| ९ | इंडियन बँक, जुहू विलेपार्ले, मुंबई | ६६३०६८४३६५ TDR NO. ०५२६५५३ | ०८.०५.२०१९ | ०८.०५.२०२० | ३९० | ७.४६ | ४१९.११ |
| १० | कॉर्पोरेशन बँक, बांद्रा (पुर्व), मुंबई | ५३०४०१०३६९९८५५२ Recipt No. २७०११४ | १५.०५.२०१९ | २२.०५.२०२० | १००० | ७.०६ | १०७७.२४ |
| ११ | बँक ऑफ बडोदा, (ई-विजया बँक) बांद्रा (पुर्व), मुंबई | ५००२१६६४००००००१ Recipt No. ०६१७७ | २२.०५.२०१९ | २२.०५.२०२० | ३५० | ७.३५ | ३७६.४४ |
| १२ | सिंडीकेट बँक, मरोल ब्रॅन्च, मुंबई | ५०३२५११००००५/१ Recipt No. SBN ९६२०९० | २२.०५.२०१८ | २२.०५.२०२० | ५५० | ७.३५ | ५९१.५५ |
| | एकुण | | | | ८३९० | | ९०२९.२२ |

**मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या मुदत ठेव गुंतवणुकीच्या सुरक्षिततेसंबंधी खालीलप्रमाणे मंडळामार्फत उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.**

१) ज्या बँकेंत मुदत ठेव गुंतवणुक करण्यात येते त्या बँकेकडून मुदत ठेवीची मुळ पावती (Original FDR) संबंधित बँकेच्या सहाय्यक महाप्रबंधक यांच्या स्वाक्षरीच्या पत्रान्वये त्याच दिवशी प्राप्त करून घेण्यात येते. त्यासोबत मुळ मुदत ठेवीच्या पावतीवर स्वाक्षरी करणाऱ्या सहाय्यक महाप्रबंधक यांच्या ओळखपत्राची प्रत जोडण्यात येते. व मुळ पावतीच्या मागील पृष्ठावर Original FDR म्हणून नमूद करून स्वाक्षांकित करण्यात येते.

२) सदर मुदत ठेवीच्या पावतीवरून त्याची नोंद मुदत ठेव नोंदवहीमध्ये घेण्यात येऊन ती स्वाक्षांकित करण्यात येते

३) सदर मुदत ठेव गुंतवणुक पावती मंडळाच्या सेन्टल बँक ऑफ इंडिया, बीकेसी, येथील लॉकर मध्ये सुरक्षित ठेवण्यात येते.

४) शासन वित्त विभागाच्या दि. २७.१०.२०१५ च्या शासन निर्णयानुसार दर तीन महिन्यांनी संबंधीत बँकाच्या मुदत ठेवीच्या रकमा सुरक्षित असून त्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. त्यानुसार मंडळाची अतिरिक्त निधीची गुंतवणूक ज्या बँकांत करण्यात आलेली आहे त्या बँकाकडुन प्रत्येक महिन्याला मंडळाची गुंतवणूक सुरक्षित असून त्यावर कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्यांचे प्रमाणपत्र नियमित प्राप्त करून घेण्यात येतात. व तसा अहवाल उपसमितीचे अध्यक्ष तथा अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना सादर करण्यात येतो.

५) मंडळाची अतिरिक्त निधीची गुंतवणुक ज्या बँक शाखेत आहे त्या बॅंकेच्या विभागीय बॅकांच्या वरिष्ठ क्षेत्रीय प्रबंधकाकडुनही गुंतवणुक सुरक्षित असुन त्यावर कर्ज /तारण/ ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात येते.

६) मंडळाच्या गुंतवणुकदार बँकाची मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात येते. सदर बैठकीस विभागीय कार्यालयाचे वरिष्ठ क्षेत्रीय प्रबंधक, सबंधित शाखेचे सहाय्यक महाप्रबंधक यांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येते, बैठकीमध्ये मंडळाची मुदत ठेव गुंतवणुक सुरक्षित असल्याबाबत आढावा घेण्यात येतो.

७) मंडळाकडील गुंतवणुकदार बँकांस मंडळाचे लेखाअधिकारी व मंडळाकडील सेवानिवृत्त अधिकारी प्रत्यक्ष भेट देऊन बँकेकडे संबंधित मुदत ठेव सुरक्षित असल्याची खातरजमा बँकेच्या संगणकिय प्रणालीचे अवलोकन करून तसेच मुदत ठेवीच्या रक्कमा सुरक्षित असल्याचे व त्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज/Over Draft नसल्याबाबत पडताळणी करण्यात येते. व त्याप्रमाणे पडताळणीची मंडळाकडील विहित नमुन्यातील नोदवहीत नोंद घेण्यात येऊन बँकेंच्या संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेण्यात येते.

८) मंडळाने गुंतवणुक केलेल्या जमा अतिरिक्त निधीचा त्रैमासिक अहवाल मंडळ बैठकीत व शासनास मंडळामार्फत नियमित सादर करण्यात येतो.

याखेरीज मुदत ठेव गुंतवणुकीच्या सुरक्षिततेसंबंधी करावयाच्या उपाययोजनेबाबत मंडळ बैठकीत निर्णय घेण्यात यावा असे प्रस्तावित आहे. सदर विषयाबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव ५१(१०)२०१९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या उपसमितीने दिनांक २२ मे २०१९ पर्यंत जमा उपकर रक्कम रू. ८३९० कोटी एवढया निधीचा विविध राष्ट्रीयीकृत बँकेत केलेल्या गुंतवणुकीस व गुंतवणूकीच्या सुरक्षेसंदर्भात करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनाबाबतच्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.११ :- नोंदित बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीच्या अनुषंगाने आरोग्य कक्षाची स्थापना करण्यास मंजुरी देण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.०२.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ ओळखपत्राच्या आधारे देण्यात येत आहे. तथापि, काही बांधकाम कामगारांना सदर योजनेबाबत व उपचाराबाबतच्या पध्दतीची सविस्तर माहिती नसल्यामुळे बांधकाम कामगार सदर योजनेचा लाभ घेऊ शकले नाही, असे निदर्शनास आले. यास्तव बांधकामाच्या ठिकाणी काम करत असलेल्या कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करून त्यावर वेळीच उपचार केल्यास, बांधकाम कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करणार नाही.

बांधकाम कामगारांची बांधकामाच्या ठिकाणी त्यांच्या आरोग्याची तपासणी करणे, या विषयाबाबत मंडळाच्या दि.०३.०१.२०१८, दि. २१.०३.२०१८ व दि.२४.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत चर्चा करून ठराव पारीत करण्यात आलेले होते.

मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेने सादर केलेला प्रस्ताव, मंडळाच्या दि.२४.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत सदर संस्थेने केलेले सादरीकरण व त्या अनुषंगाने झालेल्या सविस्तर चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

ठराव : नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीकरिता मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड यांनी प्रस्तावित केलेल्या आरोग्य तपासणीच्या कार्यवाही शिवाय सदर संस्थेने बांधकामाच्या ठिकाणी कॅम्प आयोजित करून नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करावी. बांधकामाच्या ठिकाणी आयोजित कॅम्पमध्ये उपस्थित ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली नाही त्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरिता आवश्यक कार्यवाही करावी. सदर आरोग्य तपासणीत जे बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास येतील, अशा बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचाराकरिता जवळच्या रूग्णालयात भरती करून त्याच्यावरील उपचारासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेवर सोपविण्यात यावी. याबाबतची कार्यवाही आरोग्य तपासणीच्या अतिरिक्त बाबी, कॅम्पपूर्व व कॅम्पनंतरची कार्यवाही त्यानुसार आरोग्य तपासणीचे दर याबाबतचा सुधारित प्रस्ताव मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेकडून मागविण्यात यावा. सदर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मंडळाच्या उपरोक्त ठरावानुसार मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेने सादर केलेला सुधारित प्रस्ताव, मंडळाच्या दि.२४.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत त्या संस्थेने केलेले सादरीकरण, त्या अनुषंगाने झालेली सविस्तर चर्चा व मंडळाने प्रारित केलेला ठराव विचारात घेता, मंडळाच्या दि. ०६.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

शासन पत्र दि.१६.०२.२०१९ अन्वये मंडळामध्ये नोंदित जिवित (सक्रिय) बांधकाम कामगारांची प्रति कामगार रु.१९५०/- या दराने आरोग्य तपासणी मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेमार्फत करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या दोहोंमध्ये दि.०२.०३.२०१९ रोजी एक वर्षाच्या कालावधीसाठी करारनामा करण्यात आला आहे व तसे आदेश मे.एचएलएल संस्थेस देण्यात आलेले आहेत.

शासन पत्र दि. ०६.१२.२०१८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये आरोग्य विषयक नियमाची अंमलबजावणी करण्याकरिता आरोग्य विभाग निर्माण करण्यासंदर्भात मा. प्रशांत ठाकुर, विधानसभा सदस्य यांच्या मा. मंत्री (कामगार) यांना लिहिलेल्या दि. ०२.११.२०१८ रोजीच्या पत्राची प्रत प्राप्त झाली आहे.

मंडळ स्तरावर खालील नमुद बाबींवर कार्यवाही करण्याकरिता स्वतंत्र आरोग्य कक्षाची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे.

- नोंदित बांधकाम कामगांराची आरोग्य तपासणी करण्यासाठी जिल्हा कामगार कार्यालय व मे. एचएलएल या दोहोंमध्ये समन्वय साधणे,
- मे.एचएलएल यांच्याकडून मंडळासोबत झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार विविध आरोग्य तपासण्यांचा दर्जा योग्य राहील याची खात्री करणे,
- आरोग्य तपासणीत नोंदित बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास आल्यास, सदर बांधकाम कामगारांवरील उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नियुक्त रुग्णालयामध्ये करण्यासंबधी मे. एचएलएल व राज्य आरोग्य हमी सोसायटी या दोहोंमध्ये समन्वय साधणे,
- संस्थेने सादर केलेल्या देयकाची करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधीन राहून तपासणी करणे,
- मे.एचएलएल यांच्याकडून नोंदित बांधकाम कामगांराच्या सर्व आरोग्य तपासण्याचा सविस्तर अहवाल संबंधीत बांधकाम कामगार व मंडळास विहित वेळेत प्राप्त होत असल्याबाबत खात्री करणे.

मंडळ स्तरावर, वरीलप्रमाणे प्रस्तावित आरोग्य कक्षामध्ये,

१) एक आरोग्य अधिकारी,

२) एक डेटाएन्ट्री ऑपरेटर,

३) एक लिपिक टंकलेखक,

अशा एकूण तीन अधिकारी/कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. प्रस्तावित आरोग्य कक्ष स्थापन करण्यास मंडळाची कृपया मान्यता मिळावी.

मान्यतेअंती, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्रतिनियुक्तीवर एका आरोग्य अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल. तसेच एक डेटाएन्ट्री ऑपरेटर व एक लिपिक टंकलेखक मे .ब्रिक्स इंडिया प्रा.लि, पुणे या बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात येतील. सदर विषयाबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५१(११)/२०१९ :- नोंदित बांधकाम कामगांराची आरोग्य तपासणी करण्यासाठी मे.एचएलएल या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यातील अटी शर्ती नुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत देखरेख व समन्वय साधण्यासाठी मंडळ स्तरावर स्वतंत्र आरोग्य कक्षाची स्थापना करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सदरहू आरोग्य कक्षामध्ये, एक आरोग्य अधिकारी/वैद्यकीय अधिकारी, एक डेटाएन्ट्री ऑपरेटर आणि एक लिपिक टंकलेखक यांचा समावेश राहील. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्रतिनियुक्तीवर एका आरोग्य/वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा. तसेच एक डेटाएन्ट्री ऑपरेटर व एक लिपिक टंकलेखक मे .ब्रिक्स इंडिया प्रा.लि, पुणे या बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात यावे. मंडळाच्या मान्यतेनुसार प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा व शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१२:- मंडळाच्या मंजूर आकृतीबंधानुसार उपलब्ध असलेली लेखापाल संवर्गातील दोन पदे प्रशासकीय कारणास्तव सहाय्यक लेखाअधिकारी या संवर्गामध्ये श्रेणीवाढ करून रूपांतरित करण्याबाबत.**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक. १८.०७.२०१७ रोजी झालेल्या ४२ व्या बैठकीतील ठराव क्र. ११ द्वारे मंडळाच्या आस्थापनेवरील एकूण १९ संवर्गातील ४१९ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मंडळाने मंजुरी दिली आहे. त्यापैकी ५६ पदांच्या भरतीस शासनाने दि. ०४.१०.२०१२ शासन निर्णयान्वये मंजुरी दिली असून १० संवर्गाचे प्रारूप सेवाप्रवेश नियम मंडळाच्या तज्ञसमितीची मान्यता घेऊन शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. उर्वरित संवर्गाचे प्रारूप सेवाप्रवेश नियम मंडळ स्तरावर तयार करण्यात आले असून त्यास मंडळाच्या तज्ञसमितीची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

वरीलपैकी १९ संवर्गामध्ये लेखा व वित्त संवर्गातील सहाय्यक लेखा अधिकारी (गट - ब राजपत्रित) ४० पदे व लेखापाल (गट-क) २ पदे या दोन संवर्गाचा समावेश आहे. लेखापाल या संवर्गातील दोन पदे मंडळ मुख्यालय, मुंबई कार्यालयासाठी निर्माण करण्यात आली आहेत. त्यापैकी शासनाने १ लेखापाल पद भरण्यास मंजुरी दिली आहे.

मंडळाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येणारी वित्त व लेखा संवर्गातील सर्व पदे वित्त विभागाच्या अधिपत्याखालील लेखा व कोषागारे संचालनाकडील अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून प्रतिनियुक्तीने भरण्याचे सेवाप्रवेश नियमात प्रस्तावित करण्यात आले आहे. मात्र मंडळ मुख्यालयातील लेखापालाचे १ पद प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई, तसेच सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग, यांच्याकडे मागील दोन वर्षे सतत पाठपुरावा करुन देखील सदर पदावर कर्मचारी उपलब्ध झालेला नाही. तसेच लेखा व कोषागारे कोकण विभाग यांच्याकडून १ कर्मचारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करून देण्यात आला होता परंतू तो देखील मंडळाकडे रुजू न झाल्याने सदर आदेश लेखा व कोषागार संचालनालयाकडून रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे लेखापाल पदाऐवजी सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील अधिकारी उपलब्ध करून देणे सुलभ होईल असे त्या कार्यालयाकडून सुचित करण्यात आले आहे.

मंडळाच्या कामकाजांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून अद्याप पर्यंत १५ लाखापेक्षा जास्त बांधकाम व इतर नोंदित (जिवीत) कामगारांची नोंद करण्यात आली आहे. तसेच मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या ३२ कल्याणकारी योजनावरील खर्चाचे विविध प्रकारचे लेखे व लेखापरिक्षेसंदर्भातील अहवाल तयार करणे, इत्यादी लेखाविषयक कामकाजासाठी

लेखा व वित्त संवर्गातील अधिकाऱ्यांची मंडळ मुख्यालयास तातडीने आवश्यकता आहे. मात्र लेखापाल पदावर प्रतिनियुक्तीने कर्मचारी उपलब्ध होत नसल्याने सदर पद भरणे अद्याप शक्य झालेले नाही यास्तव मंडळ मुख्यालयासाठी मंजुर करण्यात आलेली लेखापाल संवर्गातील २ पदे सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गामध्ये श्रेणीवाढ करून रूपांतरीत केल्यास सदर पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी उपलब्ध करून पद भरणे सुलभ होईल. तसेच सदर पदावरील अधिकाऱ्याकडे अधिक जबाबदारीचे काम सोपविता येईल.

लेखापाल संवर्गातील २ पदे सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गामध्ये रूपांतर केल्याने प्रत्येकी रुपये.१,११,७४४/- याप्रमाणे २ पदांसाठी वार्षिक एकूण रु. २,२३,४८८/- अंदाजे इतकी वार्षिक वाढ वेतनावर होणाऱ्या खर्चामध्ये अपेक्षित आहे.

तरी लेखापाल संवर्गातील २ पदे सहाय्यक लेखा अधिकारी गट- ब राजपत्रित या संवर्गात रूपांतरीत करण्यास मंडळाने कृपया मान्यता दयावी. सदर विषयाबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव ५१(१२)/२०१९ :- मंडळ मुख्यालयासाठी आकृतीबंधानुसार मंजूर लेखापाल संवर्गातील दोन पदे सहाय्यक लेखा अधिकारी (गट-ब, राजपत्रित) संवर्गामध्ये रुपांतरीत करुन प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यास व वेतनावरील अनुषंगिक जादा खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.१३ :- उपकर परतावा बाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम १९९६ मधील कलम ३(१) व भारत सरकार यांचे दि. २३.०९.१९९६ चे परिपत्रक तसेच महाराष्ट्र शासनाच्या दि. २१.०४.२००८ च्या परिपत्रकानूसार बांधकामावरील खर्चाच्या १ टक्केपेक्षा कमी नाही एवढा (जमीनीची किंमत वगळून) उपकर मंडळाकडे जमा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार, विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून मंडळाकडे उपकर भरणा केला जातो.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील कलम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बँक खात्यात अनावधानाने/नजरचुकीने उपकराची जास्तीची रक्कम भरणा केलेल्या एकूण १८ प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून उपकराच्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यात आलेली होती. सदर उपकर परताव्याची प्रकरणे मंडळाच्या दि. १६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. मंडळाच्या बैठकीत चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला होता.

**ठराव: उपकराच्या परताव्यांचे प्रत्येक प्रकरण हे मंजूरीसाठी मंडळासमोर ठेवून, ज्यांच्याकडून चुकीने पैसे प्राप्त झाले आहेत त्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ते तपासून त्यांना परत करण्यात यावेत.**

त्यानुसार, उपरोक्त १८ उपकर परताव्याची प्रकरणे क्षेत्रिय कार्यालयांकडे प्रत्यक्ष पडताळणी करुन त्याबाबतचं वस्तुनिष्ठ अहवाल विभागीय कार्यालयामार्फत मंडळास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे त्याबाबत परताव्याची कार्यवाही सुरु आहे.

तदनंतर, मंडळाकडे सन २०१७-१८ या कालावधीमध्ये एकूण ११ प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून अनावधानाने/नजरचुकीने भरणा केलेल्या रु. २,०३,७६,३५९.७५ एवढी रक्कम असलेल्या ११ उपकराच्या परताव्याची मागणी करण्यात आली होती. उक्त ठरावानुसार, सदरची ११ उपकराची प्रकरणे मंडळाच्या दि. २१.०३.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आली. त्याबाबत, खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला होता.

**ठराव: मंडळाच्या दि. १६.०६.२०१८ च्या बैठकीतील ठरावानुसार उपकराच्या एकूण ११ प्रकरणांचा परतावा करताना सदर प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयांकडून छाननी करुन विभागीय कार्यालयामार्फत परताव्याच्या शिफारस प्राप्त झाल्यानंतर मंडळ स्तरार छाननीअंती प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन**

**मान्यतेनुसार मंडळ स्तरावरुन परताव्याची कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

उपरोक्त ठरावानुसार सदर ११ प्रकरणे क्षेत्रिय कार्यालयांकडे प्रत्यक्ष पडताळणी करुन त्याबाबतच वस्तुनिष्ठ अहवाल विभागीय कार्यालयामार्फत मंडळास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत, मंडळाकडे ५ उपकराची प्रकरणे प्राप्त झालेली असून, सदर प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून नजरचुकीने बांधकाम कामगाराच्या उपकरापोटी भरणा करण्यात आलेल्या जास्तीच्या उपकराची मागणी केलेली आहे. तपशील खालीलप्रमाणे:

| **अ. क्र.** | **प्राधिकरण/संस्था/व्यक्तिचे नाव** | **उपकर परताव्याचे कारण** | **उपकर परताव्याच्या मागणीची रक्कम (रुपयात)** |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रफुल्ल श्यामराव होकम , नागपूर | नागपूर महापलिकेकडील बांधकाम नकाशा मंजूरी प्रकरणी अर्जदाराने नजर चुकीने महापालिकेच्या शुल्कासह उपकर रक्कमेचा भरणा मंडळाच्या बँक खात्यात केला. त्याच्या फरकाची परतावा रक्कम. | २७,६५३/- |
| २. | मे. लोटस गृहनिर्माण प्रा.लि. मुंबई | डी. एन. नगर ,म्हाडा ले-आउट, अंधेरी (प),येथील अस्तित्वातील इमारतीचे पुर्नरविकास आराखडा मंजूरी प्रकरणी ऑगस्ट २०१५ मध्ये मुंबई महानगरपालिकेने नजरचुकीने दिलेल्या मागणी पत्रानुसार १% रक्कमे ऐवजी १०% रक्कमेचा भरणा केला.त्याच्या फरकाच्या परताव्याची रक्कम तसेच सदर प्रकल्पाचे नोव्हेंबर २०१७ मध्ये सुधारित आराखडयानुसार कमी झालेल्या चटईक्षेत्रावर यापूर्वी भरलेल्या उपकाराच्या परताव्याची रक्कम . | ४५,३३,३२२.७५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत चेंबूर येथील प्रकल्प बंद करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी ,झो.पु.प्रा.यांनी मान्यता दिली असल्याने झो.पु.प्राधिकरण यांनी सदर प्रकल्पाअंतर्गत भरणा करण्यात आलेल्या कामगार कल्याण उपकराच्या परताव्याची रक्कम. | १,९१,२१,०००/- |
| ४. | मे. शुभम बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स, पनवेल | पनवेल महानगरपालिकडे भरावयाचे शुल्क नजरचुकीने मंडळाच्या बँक खात्यात भरणा केलेली रक्कम . | ८,५४,७९३/- |
| ५. | श्री. राजाराम बाजीराव जाचक, नागपूर | नागपूर महापलिकेकडील बांधकाम नकाशा मंजूरी प्रकरणी अर्जदाराने नजर चुकीने महापालिकेच्या शुल्काचाही भरणा मंडळाच्या बँक खात्यावर केला त्याबाबत परताव्याची रक्कम. | ८६,३१५/- |
| | | **एकूण रक्कम** | **२,४६,२३,०८ ३.७५** |

प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून मंडळाकडे अनावधानाने/नजरचुकीने भरणा केलेल्या रक्कम रु. २.४६ कोटी एवढया ५ उपकराच्या परताव्याची प्रकरणे मंडळ मान्यतेसाठी सादर.

मंडळ मान्यतेनंतर सदर परताव्याची प्रकरणे संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडे पडताळणीसाठी पाठविण्यात येतील. पडताळणीचा अहवाल व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या परताव्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. सदर विषयाबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव ५१(१३)/२०१९ :- मंडळाच्या दिंनाक १६.०६.२०१६ च्या बैठकीतील ठरावानुसार उपकराच्या एकूण ५ प्रकरणांच्या रु. २.४६ कोटी एवढया रक्कमेच्या परतावा करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर प्रकरणे**

संबंधित जिल्हा कार्यालयांकडून छाननी करून विभागीय कार्यालयामार्फत परताव्याच्या शिफारस प्राप्त झाल्यानंतर मंडळ स्तरावर छाननीअंती प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार पूढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.१४:- उस्मानाबाद जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या नोंदणी व लाभ वाटपामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत सविस्तर चौकशी करण्यास परवानगी देण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास,अर्जदार श्री. पाशाभाई बाबुलाल शेख, रा.महाळंगी, ता.जि.उस्मानाबाद,यांनी गै.अ.श्री.जी.व्ही मिटके, प्रभारी सरकारी कामगार अधिकारी व इतर सरकारी कर्मचारी, कामगार कार्यालय उस्मानाबाद यांचे विरूध्द प्राप्त तक्रारीबाबत चौकशी करण्याची व गुन्हा निष्पत्र झाल्यास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम १७ (अ) नुसार तपास करण्याची विनंती केली आहे. या प्रकरणाची पूर्वपिठीका खालील प्रमाणे :-

श्री. पाशाभाई बाबुलाल शेख, राहणार महाळंगी तालुका जिल्हा उस्मानाबाद यांनी दिनांक. ०७.१०.२०१७ रोजी पोलिस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद यांना एक तक्रार अर्ज सादर केला होता. यामध्ये प्रामुख्याने मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध अर्थसहाय्य योजनांमध्ये सरकारी कामगार अधिकारी, उस्मानाबाद या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच दलाल/मध्यस्थ यांनी सुमारे ३ कोटी रक्कमेचा अपहार/भ्रष्टाचार केल्याचे नमूद केले आहे. सदरहू तक्रार अर्जावर पोलिस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद यांच्या कार्यालयाकडून कार्यवाही सुरू आहे असे सांगून देखील संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आल्यावर श्री. शेख यांनी मा. पोलिस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दि. ०४.०५.२०१८ रोजी तक्रार अर्ज सादर केला. सदरहू तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मा.पोलिस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संबंधीत गै.अ.श्री.जी.व्ही मिटके प्रभारी सरकारी कामगार अधिकारी व इतर सरकारी कर्मचारी, कामगार कार्यालय उस्मानाबाद यांचे विरूध्द प्राप्त तक्रारीबाबत चौकशी करण्याची व गुन्हा निष्पन्न झाल्यास, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम १७ (अ) नुसार तपास करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे. शासनाने दि.१६.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये श्री. शेख यांच्या तक्रार अर्जातील मुद्याच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना दिले. सदरहू शासन पत्राची प्रत सचिव तथा मु.का.अ, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार

कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना पृष्ठांकित करण्यात आली आहे. सदरहू प्रकरण महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याशी संबंधीत असल्याने मा. कामगार आयुक्त, कार्यालयाने दिनांक. ०६.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडून सुस्पष्ट अभिप्राय मागविले आहेत.

श्री. पाशाभाई शेख यांच्या तक्रार अर्जातील गांभीर्य लक्षात घेऊन मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दि. ०७.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कामगार उपआयुक्त, औरंगाबाद यांना तक्रारीची शहानिशा करून सविस्तर चौकशी अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या होत्या.त्यानुसार कामगार उप आयुक्त, औरंगाबाद कार्यालयाकडून दि. ०८.०५.२०१८ रोजीच्या आदेशान्वये एक चौकशी पथक नियुक्त करण्यात आले होते. सदरहू चौकशी पथकाने श्री. शेख यांच्या तक्रार अर्जातील विविध तक्रारीसंदर्भात संबंधित कार्यालयात जाऊन उपलब्ध अभिलेख्यांची तपासणी करुन चौकशी अहवाल सादर केला आहे. या प्रकरणी तक्रारदार श्री. पाशाभाई शेख हे स्वत: देखील भ्रष्टाचारात गुंतलेले आहेत, असेही त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे.

कामगार उप आयुक्त, औरंगाबाद व त्यांच्या कार्यालयातील चौकशी पथकाने केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने तक्रारदाराचे मुद्दे व त्या संदर्भातील चौकशीपथकाचे अभिप्राय दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

**कामगार उप आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी श्री. शेख यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करून त्यांच्या चौकशी अहवालात खालील प्रमाणे शिफारस केली आहे :-**

**१.** प्रकरणाशी संबंधित अर्जदाऱ्यांची संख्या (नोंदित बांधकाम कामगार) तसेच त्यात गुंतलेले अधिकारी/कर्मचारी तसेच दलाल, मध्यस्थी व तक्रारदार यांचे एकमेकांशी असलेले संबंध यांची व्याप्ती मोठी असल्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी स्वतंत्र यंत्रणेमार्फत होणे आवश्यक आहे, यामध्ये तज्ञ अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करावा.

**२.** तक्रारदार श्री.पाशाभाई, निलंबित शिपाई श्री.शेख हारूण,कंत्राटी कर्मचारी श्री. अविनाश देशपांडे, नोंदित बांधकाम कामगार श्री. प्रमोद कुलकर्णी, लाभार्थी श्रीमती. गायत्री कुलकर्णी, श्री. प्रमोद कुलकर्णी यांची मंडळात नोंदणी करणारे अधिकारी व त्यांना रू.३५०००/- चा लाभ दोन वेळा वाटप करणारे अधिकारी हे सकृतदर्शनी दोषी असल्याचे दिसून येत आहे.

**३.** तसेच ब्रिक्स इं. लि. पुणे या बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या व सध्या कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा तात्काळ संपुष्टात आणणे गरजेचे आहे.

उपरोक्त, **शिफारस क्र.३** च्या अनुषंगाने मंडळाकडील पत्र क्र. मइवइबांकाकमं/कंत्राटी कर्मचारी तक्रार/२०१९/८०८, दि. ०९.०५.२०१९ व सुधारित पत्र दि. ३१.०५.२०१९ अन्वये ब्रिक्स इं. लि.

यांच्याकडील उस्मानाबाद कार्यालयात कार्यरत असलेल्या सर्वश्री. महादेव राजेंद्र काकडे, कनिष्ठ लेखापाल, अविनाश अनिल देशपांडे, लिपीक टंकलेखक, एस.जी.वैदूय, लिपीक टंकलेखक व जी.जे.राऊत, डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या सेवा तात्काळ संपुष्टात आणण्याच्या सूचना सहाय्यक कामगार आयुक्त, उस्मानाबाद यांना देण्यात आलेल्या आहेत.

वरील नमूद **शिफारस क्र.१ आणि २** च्या अनुषंगाने, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी कामगार विभागातील जेष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेले एक चौकशी पथक नेमण्याचे प्रस्तावित आहे. सदरहू चौकशी पथकामध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश असावा.

१. अप्पर कामगार आयुक्त, पुणे
२. सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर
३. सरकारी कामगार अधिकारी, अमरावती
४. लेखा अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुख्यालय मुंबई.

वरील प्रमाणे प्रस्तावित चौकशी पथकाने तक्रारदार श्री. पाशाभाई शेख यांच्या तक्रार अर्जातील सर्व मुद्यांच्या अनुषंगाने, संबंधीत अभिलेख्यांची फेर तपासणी करावी, तसेच आवश्यक तेथे सर्व संबंधितांचे, म्हणजेच तक्रारदार,लाभार्थी, कंत्राटी कर्मचारी इत्यादीचे जबाब नव्याने नोंदवावेत. तक्रार अर्जात नमूद लाभार्थीच्या लाभ वाटप प्रकरणाव्यतिरिक्त सरकारी कामगार अधिकारी, उस्मानाबाद यांच्या कार्यालयामार्फत विविध योजनांच्या लाभ वाटपासंबंधित प्रत्येकी दोन-तीन प्रकरणी लाभार्थ्याची नोंदणी, नुतनीकरण, लाभवाटप या मुद्यांच्या अनुषंगाने, **Random** पध्दतीने प्रकरणाची निवड करून त्यातील अभिलेख्यांची सखोल तपासणी करावी. चौकशी पथकाने त्यांचा चौकशी अहवाल १ महिन्यात मंडळास सादर करावा.

प्रस्तावित चौकशी प्रथकाचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर, त्या चौकशी अहवालातील शिफारशी विचारात घेऊन, त्यानुसार मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना अहवाल सादर करण्यात येईल. ही वस्तूस्थिती विचारात घेता, उस्मानाबाद जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या नोंदणी व लाभ वाटपामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत उपरोक्त पथकाकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर महासंचालक, लाचलुचपत

प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत सविस्तर चौकशीची आवश्यकता आहे किंवा कसे, याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेता येईल.

वरील नमूद प्रस्तावित कार्यवाहीस मंडळाची मान्यता मिळाल्यास, प्रस्तावित केल्याप्रमाणे कामगार विभागातील जेष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या चौकशी पथकाकडून चौकशी करण्यात येईल.

**कामगार उप आयुक्त, औरंगाबाद व त्यांच्या कार्यालयातील चौकशी पथकाने केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने तक्रारदाराचे मुद्दे व त्या संदर्भातील चौकशीपथकाचे अभिप्राय दर्शविणारे विवरणपत्र**

| अ.क्र | तक्रार | चौकशी पथकाचे अभिप्राय |
|---|---|---|
| १. | उस्मानाबाद जिल्हयातील कामगार कार्यालयात सन २०१२-१३ पासून मंडळाच्या १९ विविध योजनांमध्ये नोंदणी झालेले ८०% कामगार बोगस आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात मंडळाने केलेल्या नोंदणी, नुतनीकरण व विविध योजनांच्या लाभ वाटपात तात्कालीन प्रभारी सरकारी कामगार अधिकारी श्री. जे.वी. मिटके, प्रभारी सरकारी कामगार अधिकारी तथा किमान वेतन निरिक्षक श्री.एस.आर. सोलंकर, प्रभारी सरकारी कामगार अधिकारी तथा दुकाने निरिक्षक श्री. ए.एस. काशीद, लिपीक श्री. ए.आर.पवार, कंत्राटी कर्मचारी सर्वश्री.काकडे व देशपांडे, श्री. वैद्य, दलाल व अन्य मध्यस्थ यांनी संगनमत करून कोटयावधी रूपयांचा अपहार/भ्रष्टाचार केला आहे. | तक्रारकर्ते यांनी सन २०१३ ते २०१७ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हयात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने नोंदणी व नुतणीकरण तसेच मंडळाने राबविलेल्या विविध योजनात वरील कालावधीत सरकारी कामगार अधिकारी या पदावर कार्यरत असलेले अधिकारी तसेच लिपीक टंकलेखक श्री. ए. आर. पवार, कंत्राटी कर्मचारी श्री काकडे, देशपांडे व वैद्य यांनी दलाल, मध्यस्थ, यांचेशी संगनमत करुन कोटयावधी रुपयांचा अपहार/ भ्रष्टाचार केला आहे. या भ्रष्टाचारामध्ये सन २०१३ ते २०१७ या कालावधीत झालेल्या विविध अर्थसहाय्य वाटपातील एकूण रु. ८ ते ९ कोटी एवढया |

| | | |
|---|---|---|
| | | अर्थसहाय्यापैकी अंदाजे रु.३ ते ३.५ कोटी एवढया रुपयांचा अपहार वरील अधिकारी/ कर्मचारी, दलाल व स्वत: तक्रारदार मध्यस्थ म्हणून, त्यांचे समक्ष साखळी पध्दतीने झालेला आहे, असे म्हणणे आहे. सरकारी कामगार अधिकारी, उस्मानाबाद या कार्यालयास मंडळाने दिलेल्या एकूण रुपये १६,९२,३२,४०२/- एवढया निधीपैकी रुपये १०,९३,७९,४०४/- एवढया रक्कमेचे वाटप धनादेशाद्वारे/आरटीजीएसद्वारे झाल्याचे दिसून येत आहे. उस्मानाबाद कार्यालयात आज मितीस सुमारे ४०,००० कामगार नोंदित करण्यात आले असून, त्यापैकी सुमारे २०६८० नोंदित कामगारांना रु. १२.३१ कोटी इतकी रक्कम लाभापोटी वाटण्यात आली आहे. तक्रारदाराने सुमारे ८०% कामगारांची बोगस नोंदणी झाल्याचे नमुद केले आहे. असे बोगस कामगार किती व किती प्रकरणामध्ये भ्रष्टाचार/ अपहार झालेला आहे, हे तपासण्यासाठी सर्व नोंदणी अर्जाची तपासणी करणे आवश्यक आहे. याची |

| | | |
|---|---|---|
| | | व्याप्ती मोठी असल्यामुळे सदर बाब तपासण्यासाठी मोठया प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्याकरिता सदर तक्रारीची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करावी. |
| २. | सन २०१४ ते सन २०१७ मध्ये झालेल्या रुपये. ४ ते ५ कोटी एवढया अर्थसहाय्य वाटपापोटी –<br>वैदयकीय/अभियांत्रिकीपदवीअभ्यासक्रमाकरिता अर्थसहाय्य<br>रुपये. ३५०००/-,<br>गंभीर आजार अर्थसहाय्य रु. २५०००/- आणि, प्रसुती अर्थसहाय्य रु. १५०००/- व रु. १००००/- व अन्य योजना<br>यामध्ये मोठया प्रमाणात अपहार झाला आहे. दि. ०१.०१.२०१६ ते ०९.०२.२०१७ या कालावधीत वाटप झालेल्या रु. ३५०००/- अर्थसहाय्यामध्ये मोठया प्रमाणात अपहार झाला आहे. अर्ज एका लाभार्थ्याचा परंतु, लाभाची रक्कम मध्यस्थानीं दिलेल्या अन्य व्यक्तीच्या खाते क्रमांकावर जमा करणे या कार्यपध्दतीमध्ये सुमारे १६ ते १७ दलालांमार्फत अपहार झाला आहे. | बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित झालेल्या बांधकाम कामगारांपैकी जवळपास ८० टक्के नोंदित बांधकाम कामगारांनी कोणत्यातरी योजनेचा लाभ स्विकारलेला असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. वरील कालावधीत सरकारी कामगार अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार राहिलेल्या अधिका-यांपैकी श्री. सोलंकर, किमान वेतन निरीक्षक यांना सेवेतून कमी करण्यात आलेले असून श्री. जे.व्ही.मिटके हे सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच श्री, डी.टी.पाटील व श्री. पी.एस.पांडे हे अधिकारी देखील सेवानिवृत्त झालेले आहेत. या प्रकरणाशी संबंधित अर्जदारांची संख्या (नोंदित बांधकाम कामगार) तसेच त्यात गुंतलेले अधिकारी/ कर्मचारी, दलाल/मध्यस्थी व तक्रारकर्ते यांचे एकमेकांशी |

| | | |
|---|---|---|
| | | असलेले संबंध, याची व्याप्ती मोठी असल्यामुळे सदर प्रकरणाची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी होणे आवश्यक आहे. |
| ३. | प्रमोद रामचंद्र कुलकर्णी या बोगस कामगाराने दोन वेळेस रुपये ३५,०००/- असे एकुण रुपये ७०,०००/- उचल केली आहे.<br>श्री. सय्यद अतिखउल्ला हुसैनी या बोगस कामगाराने रुपये. ३५,०००/- अशी उचल केली आहे. | कंत्राटी कर्मचारी श्री अविनाश उर्फ गुरु देशपांडे यांची मंडळातील सेवा तात्काळ संपुष्टात आणावी अशा सुचना ब्रिक्स (इं) लि. यांना देण्याच्या सुचना सरकारी कामगार ४अधिकारी, उस्मानाबाद कार्यालयास देण्यात येत आहेत. याशिवाय श्री प्रमोद रामचंद्र कुलकर्णी यांचा नोंदणी अर्ज कार्यालयातून गहाळ होण्यास कोण कर्मचारी जबाबदार आहे, याची चौकशी करुन त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना सरकारी कामगार अधिकारी, उस्मानाबाद यांना देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय श्री प्रमोद रामचंद्र कुलकर्णी हे बांधकाम कामगार आहेत काय, याची चौकशी करण्याच्या सूचनाही सरकारी कामगार अधिकारी, उस्मानाबाद यांना देण्यात आलेल्या आहेत. श्री प्रमोद रामचंद्र कुलकर्णी हे बांधकाम कामगार नसतील तर |

| | | |
|---|---|---|
| | | त्यांचे विरुध्द मंडळाची फसवणूक केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करावी तसेच त्यांचेकडून लाभापोटी उचलण्यात आलेली रक्कम रु. ७०,०००/- वसूल करण्यासंदर्भात कायदेशीर कारवाई पूर्ण करावी, अशा सूचना सरकारी कामगार अधिकारी, उस्मानाबाद यांना देण्यात आलेल्या आहेत. |

**ठराव क्र. ५१(१४)/२०१९ :- कामगार उप आयुक्त, औरंगाबाद व त्यांच्या कार्यालयातील चौकशी पथकाने केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने सादर केलेल्या चौकशी अहवालातील शिफारस क्र.१ आणि २ च्या अनुषंगाने, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी कामगार विभागातील कामगार उप आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात यावी. चौकशी समितीचा अहवाल मंडळाच्या अभिप्रायासह कामगार आयुक्त यांच्या मार्फत पूढील कार्यवाहीसाठी शासनास सादर करण्यात यावा.**

**असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**आयत्या वेळचे विषय क्र.१५-**

**आयत्या वेळचे विषय क्र.१५ (०१):- नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना प्रायोगिक तत्वावर पुणे येथे मध्यान्ह भोजन पुरविणेबाबत**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन पुरविणेबाबत मंडळाने पारित केलेल्या दि.२८.०२.२०१७ व दि.०६.०६.२०१७ च्या ठरावास अनुसरून मंडळाच्या दि.२२.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये योजना मंजुरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. तदनंतर, दि.०३.०१.२०१८ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत सुधारित RFP ला मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर RFP सुध्दा शासनमान्यतेस सादर करण्यात आली होती. शासनस्तरावरून योजना राबविण्यास दि.१२.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये व सुधारित RFP ला दि.२७.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती.

मंडळस्तरावरून दि.१९.०३.२०१८ ते दि.१५.०६.२०१८ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ई-निविदा सूचनेच्या प्रतिसादात प्राप्त निविदांची निविदा खरेदी समितीमार्फत छाननीअंती शासनास सादर प्रस्तावास शासनाच्या दि.०१.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर मान्यतेनुसार पुणे, अमरावती व नागपूर या विभागाकरीता मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी, नागपूर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच, त्यांनी सादर केलेले प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन रू.६२.७०/-(१८% वस्तू सेवा करासह) खरेदी समितीच्या शिफारशीअंती शासन स्तरावरून स्विकृत करण्यात आलेले आहेत.

मंडळाच्या दि.०१.०३.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार दि.०५.०३.२०१९ रोजी पुरवठादार संस्थेसोबत करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारातील अटी शर्तीला अनुसरून प्रथम ०३ महिन्याकरीता गट-०३ मधील पुणे विभाग, अमरावती विभाग व नागपूर (निविदा क्र.०६) या गटातील नागपूर येथे प्रायोगिक तत्वावर मध्यान्ह भोजन पुरवठयाचे आदेश देण्यात आलेले आहेत.

मा. श्री. संजय (बाळा) विश्वनाथराव भेगडे, आमदार, मावळ विधानसभा मतदारसंघ यांनी त्यांच्या दि.०८.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये व बांधकाम कामगार सेना, पुणे यांनी त्यांच्या दि.२५.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये पुणे येथे मोठया प्रमाणावर बांधकाम व इतर मजूर कार्यरत असून या बांधकाम कामगारांना अटल आहार योजने अंतर्गत मध्यान्ह भोजनाचा पुरवठा सुरू करणे गरजेचे आहे. तरी पुणे जिल्हयात या योजनेचा त्वरीत लाभ देण्याबाबत

विनंती केलेली आहे. मा. आमदार महोदय यांच्या विनंतीस अनुसरून मंडळ स्तरावरून मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी, नागपूर यांना पुणे येथे प्रायोगिक तत्वावर मध्यान्ह भोजन वितरणाकरीता सहमती देण्याबाबत दि.२२.०५.२०१९ रोजी कळविण्यात आले होते. त्यानुसार मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी, नागपूर यांनी त्यांच्या संदर्भिय क्र.०६ च्या दि.२३.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये लेखी संमती दिलेली आहे.

मा. आमदार महोदयांचा उपरोक्त प्रस्ताव व मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी, नागपूर यांची लेखी संमती विचारात घेता मंडळ स्तरावरून मागविण्यात आलेल्या ई-निविदा अटी शर्तीमध्ये मुंबई/ नवी मुंबई, ठाणे व नागपूर या ०३ ठिकाणाशिवाय पुणे येथे २०,००० बांधकाम कामगारांना प्रायोगिक तत्वावर ०३ महिन्याकरीता सदर विभागाकरीता नियुक्त मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी, नागपूर या संस्थेमार्फत मध्यान्ह भोजन वितरणास शासन मान्यता प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव दि.२७.०५.२०१९ रोजी शासन मान्यतेस सादर करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला आहे. याविषयी सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव ५१(१५-०१)/२०१९ :- अटल आहार योजनेअंतर्गत मुंबई/नवी मुंबई, ठाणे व नागपूर या तीन ठिकाणाशिवाय पूणे येथे प्रायोगिक तत्वावर २० हजार नोंदित बांधकाम कामगारांना अटल आहार योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजन वितरणास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. शासन मान्यतेअंती मे. पारसमल पगारीया ॲड कंपनी नागपूर या नियुक्त संस्थेस पुरवठा आदेश देण्यात यावे. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**आयत्या वेळचे विषय क्र.१५ (०२) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी मिळण्याबाबत.**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून नोंदीत सक्रीय (जिवित) कामगारांसाठी ३० विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. मंडळाकडे आजमितीस सुमारे १५.०७ लक्ष बांधकाम कामगार नोंदीत असून नजीकच्या काळात त्यामध्ये वाढ होणार आहे. सद्यस्थितीत सुमारे ९.२७ लक्ष नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत शासनाच्या ३० कल्याणकारी योजना पोहोचविण्याचे उदिष्ट मंडळासमोर आहे.

मंडळातील अपूरे मनुष्यबळ हे मंडळाच्या कामकाजापुढील मोठे आव्हान आहे. मंडळाच्या मुख्यालय अथवा जिल्हास्तरावर स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसल्याने कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्याकडून मंडळाचे कामकाज अतिरिक्त स्वरुपात करुन घेतले जात आहे. मंडळाचे मुख्यालय, ६ विभागीय कार्यालये आणि ४० जिल्हा कार्यालये ही, कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अत्यंत महत्वाची आहेत. मंडळाकडे मोठया प्रमाणावर उपकर जमा होत आहे. ह्या उपकराचा लेखा ठेवणे, बँकेशी मेळ घालणे व इतर अनुषंगिक कामकाजासाठी मंडळास मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता आहे. मंडळाच्या दिनांक १८/०७/२०१७ रोजीच्या बैठकीत मंडळाच्या मुख्यालयासाठी ५१, विभागीय कार्यालयांसाठी ४८ आणि जिल्हा कार्यालयांसाठी ३२० अशा एकूण ४१९ पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. दिनांक १८/०७/२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मंडळाच्या दिनांक २२/०९/२०१७ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. मंडळाच्या विविध योजनांच्या प्रभावशाली अंमलबजावणीसाठी मंडळास खाली नमुद केल्यानुसार ३ अतिरिक्त पदांची आवश्यकता आहे.

अ) मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्या दालनात दि. २६/११/२०१८ रोजी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांची सविस्तर चर्चा झाली. सदरहू चर्चेच्या वेळी मंडळाच्या दि. ३०/१०/२०१८ रोजीच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना ग्रामविकास विभागाच्या सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यासाठी व सदर योजनेच्या कार्यान्वयाकरीता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ स्तरावर रु.

९३००-३४८००, ग्रेड पे. ४४०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) S-१५: रु ४१८००-१३२३०० (सातव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीत "सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य)" या संवर्गातील एक पद निर्माण करावे आणि सदर पद मंडळामार्फत जलसंपदा विभाग /सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंधारण विभागातून प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे, असा ठराव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

ब) मंडळ मुख्यालय, विभागीय कार्यालये व जिल्हा सुविधा केंद्रे एकात्मिक संगणकीय प्रणाली व्यवस्थापन सेवेने जोडणे अत्यावश्यक आहे, त्यासाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदा प्रसिध्द करण्यात येवून पात्र संस्थेची (Integrated Online Management Service Provider) निवड करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेवून मंडळाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या हार्डवेअर व सॉफ्टवेअर बाबत उद्भवणारे मुद्दे/अडीअडचणी हाताळण्यासाठी रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ५००० (सहाव्या वेतन आयोगानुसार) S-१८: रु ४९१००-१५५८०० (सातव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीमध्ये "सिस्टीम ॲनालिस्ट" हे पद नव्याने मंजूर करुन घेण्याची आवश्यकता आहे. सदर पद मंडळामार्फत केंद्रशासनाच्या अथवा राज्य शासनाच्या अधिनस्त कार्यालयातून समकक्ष पदांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे, असा ठराव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

क) मंडळ बैठकीतील विषय क्र. ११ नुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये आरोग्य विषयक नियमाची अंमलबजावणी करण्याकरिता आरोग्य विभाग निर्माण करण्यास मंडळाची तत्वत: मान्यता आहे असे गृहित धरून मंडळ स्तरावर, प्रस्तावित आरोग्य कक्षामध्ये, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) S-२०: रु ५६१००-१७७५०० (सातव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीतील "आरोग्य अधिकारी/वैद्यकीय अधिकारी" हे पद नव्याने मंजूर करुन घेण्याची आवश्यकता आहे. सदर पद मंडळामार्फत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील समकक्ष पदांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे, असा ठराव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ५१(१५-०२)/२०१९ :- मंडळाच्या दि. १८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ४१९ पदांच्या आकृतीबंधात "सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य)", "सिस्टीम ॲनालिस्ट" व "आरोग्य अधिकारी/वैद्यकीय अधिकारी" या तीन पदांचा समावेश करुन एकूण ४२२ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात येत आहे. तसेच, मंडळाकडील**

सर्व संवर्गातील पदांना राज्य शासनाने सातव्या वेतन आयोगानुसार लागू केलेल्या संबंधित वेतनश्रेण्या लागू करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा व शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

## प्रपत्र — १

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रस्तावित सुधारीत आकृतीबंध त्रिस्तरीय संरचना - मुख्यालय, मुंबई-६ प्रादेशिक विभागीय कार्यालये (मुंबई,नागपूर, पुणे, नाशिक, औरंगाबाद, व अमरावती) व ४० जिल्हा कार्यालये

| अ.क्र. | पदांचे नांव व वेतनश्रेणी+ग्रेडवेतन | संवर्ग | मुख्यालय मुंबई | | | ६ प्रादेशिक कार्यालये | | | जिल्हा कार्यालये | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | BOC | | | BOC | | | BOC | | | |
| | | | मंजूर | नवीन | एकूण | मंजूर | नवीन | एकूण | मंजूर | नवीन | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | सचिव व मुख्य अधिकारी कार्यकारी(सह आयुक्त या संवर्गाशी समकक्ष) (रु.३७४००-६७०००+८९००) | गट-अ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | विधी सल्लागार (रु.१५६००-३९१००+६६००) | गट-अ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | प्रादेशिक कार्यकारी अधिकारी (रु.१५६००-३९१००+६६००) | गट-अ | ० | ० | ० | ० | ६ | ६ | ० | ० | ० | ६ |
| ४ | सहायक संचालक लेखा व लेखा व वित्त अधिकारी वर्ग-१ (रु.१५६००-३९१००+६६००) | गट-अ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | आरोग्य/ वैद्यकीय अधिकारी (रु.१५६००-३९१००+५४००) | गट-अ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ६ | जिल्हा कार्यकारी अधिकारी (रु. ९३००-३४८००+५०००) | गट-अ | १ | १ | २ | ० | ० | ० | ० | ४० | ४० | ४२ |
| ७ | सिस्टीम ॲनालिस्ट (रु.९३००-३४८००+५०००) | गट-अ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | गट-अ | १ | ६ | ७ | ० | ६ | ६ | ० | ४० | ४० | ५३ |
| ८ | लेखा व वित्त अधिकारी (वर्ग-२) (रु.९३००-३४८००+४६००) | गट-ब | १ | १ | २ | ० | ६ | ६ | ० | ० | ० | ८ |
| ९ | उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (रु.९३००-३४८००+४४००) | गट-ब | १ | ३ | ४ | ० | ६ | ६ | १९ | २१ | ४० | ५० |
| १० | सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) (रु.९३००-३४८००+४४००) | गट-ब | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ११ | सहायक लेखा अधिकारी (रु.९३००-३४८००+४४००) | गट- ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४० | ४० | ४० |
| | एकूण | गट-ब | २ | ५ | ७ | ० | १२ | १२ | १९ | ६१ | ८० | ९९ |
| १२ | अधिक्षक (रु.९३००-३४८००+४३००) | गट-क | १ | ३ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| १३ | लघुलेखक (उच्चश्रेणी) (रु.९३००-३४८००+४४००) | गट-क | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १४ | लघुलेखक (निम्नश्रेणी) (रु.९३००-३४८००+४३००) | गट-क | ० | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| १५ | उप लेखापाल (रु.९३००-३४८००+४२००) | गट-क | १ | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| १६ | लघुटंकलेखक (इंग्रजी/मराठी) (रु. ५२००-२०२००+२४००) | गट-क | १ | २ | ३ | ० | ६ | ६ | ० | ० | ० | ९ |
| १७ | वरिष्ठ लिपिक (रु. ५२००-२०२००+२४००) | गट-क | २ | २ | ४ | ० | ६ | ६ | ० | ० | ० | १० |
| १८ | लिपिक टंकलेखक (रु. ५२००-२०२००+१९००) | गट-क | ४ | ८ | १२ | ० | ६ | ६ | १९ | २१ | ४० | ५८ |
| १९ | डेटा एंट्री ऑपरेटर्स (रु. ५२००-२०२००+१९००) | गट-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ८० | ८० | ८० |
| २० | वाहन चालक (रु. ५२००-२०२००+१९००) | गट-क | २ | २ | ४ | ० | ६ | ६ | ० | ४० | ४० | ५० |
| | एकूण | गट-क | ११ | २१ | ३२ | ० | २४ | २४ | १९ | १४१ | १६० | २१६ |
| २१ | दप्तरी (रु.४४४०-७४४०+१६००) | गट-ड | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २२ | शिपाई (रु. ४४४०-७४४०+१३००) | गट-ड | ३ | ४ | ७ | ० | ६ | ६ | ० | ४० | ४० | ५३ |
| | एकूण | गट-ड | ४ | ४ | ८ | ० | ६ | ६ | ० | ४० | ४० | ५४ |
| | एकूण गट-अ+गट+ब-गट-क+गट-ड | | १८ | ३६ | ५४ | ० | ४८ | ४८ | ३८ | २८२ | ३२० | ४२२ |

**आयत्या वेळचे विषय क्र.१५ (०३): सन २०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षाचे लेखा व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापालांची नियुक्तीस मुदत वाढ देणे बाबत.**

मंडळाच्या दि. ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये मंडळाचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाचे लेखा, लेखांकन व आयकर विषयक कामकाज अद्याप प्रलंबित आहे व ते पुर्ण करण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या पॅनलवरील सनदी लेखापालांची सदर कामकाजासाठी नियुक्ती करण्यासाठी तीन दरपत्रके मागवून सनदी लेखापालांची नियुक्ती करणेबाबत सर्वानुमते ठराव करण्यात आला होता. त्यानुसार तीन दरपत्रके मागवून खालीलप्रमाणे कमी दर असलेल्या मे. संघवी अॅड कंपनी, घाटकोपर मुंबई यांना मंडळाचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाचे लेखा, लेखांकन व आयकर विषयक कामकाजासाठी नियुक्ती करण्यात आली होती.

| **अनु क्र.** | **वर्ष** | **कामकाजाचे स्वरुप** | **दर** |
|---|---|---|---|
| १. | २०१६-१७ व २०१७-१८ | लेखा, लेखांकन विषयक कामकाज | ३,००,०००/- प्रत्येक वित्तय वर्षासाठी (जीएसटी सह) |
| २. | २०१७-१८ | आयकर विषयक कामकाज | ६०,०००/- (जीएसटी सह) |

मे. संघवी अॅड कंपनी, घाटकोपर मुंबई यांनी मंडळाच्या सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षाच्या लेखा, लेखांकन व आयकर विषयक कामकाज विहीत वेळेत पूर्ण करुन मंडळास सादर केलेले आहे. तसेच मंडळाच्या सन २०१८-१९ या वर्षाच्या लेखांकन व आयकाराचे विहीत मुदतीत पुर्ण होणे आवश्यक असल्यामुळे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे लेखाविषयक व आयकर बाबत कामकाज करणेसाठी मे. संघवी अॅड कंपनी, घाटकोपर मुंबई यांना मुदत वाढ देण्याबाबत मंडळाच्या मान्यतेसत्व सादर करण्यात येत आहे. सदर विषयी सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात येत आहे.

